**सुविचार**

जब कोई कार्य प्रेमभाव के साथ किया जाता है तो उसमें तत्काल सफलता मिलती है ।

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. ३ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१११ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# विश्वासघाताचे दुसरे नाव म्हणजे टीएमसी



कृष्णनगर : लोकसभा निवडणुकीपूर्वी बंगाल दौऱ्यावर आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार निशाणा साधला. कृष्णनगरमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, टीएमसी हे अत्याचाराचे दुसरे नाव आहे. टीएमसी म्हणजे विश्वासघात, भ्रष्टाचार आणि घराणेशाही. टीएमसीने गरिबांची लूट केली आहे. ममता बॅनर्जींच्या टीएमसीला लोकांना गरीब ठेवायचे आहे. त्यामुळे पश्चिम बंगालचा विकास होणे आवश्यक आहे. मोदींनी पश्चिम बंगालला पहिले एम्स दिले आहे.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, ही भूमी भगवान कृष्णाच्या भक्तीचे सर्वोच्च प्रचारक चैतन्य महाप्रभू यांची जन्मभूमी आहे. चैतन्य महाप्रभूंच्या चरणी नतमस्तक होतो. हे माझे सौभाग्य आहे की काही दिवसांपूर्वीच मला समुद्राच्या खोल पाण्यात जाऊन भगवान श्रीकृष्णाच्या प्राचीन भूमीला, भगवान श्रीकृष्णाने स्थापन केलेल्या द्वारका नगरीला नमन करण्याचे भाग्य लाभले.

एवढ्या मोठ्या संख्येने तुम्ही सर्वजण इथे जमलेले पाहून एनडीए सरकार, ४०० पार हे सांगण्याचा आत्मविश्वास मला मिळत आहे. पश्चिम बंगालमध्ये हा माझा दुसरा दिवस आहे. गेल्या २ दिवसात मला बंगालसाठी विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्याची संधी मिळाली. यामुळे गुंतवणूक येईल, रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि शेजारच्या भागावर परिणाम होईल. मात्र, तृणमूल सरकारने बंगालच्या जनतेचा अपेक्षाभंग केला आहे, हे मान्य करावे लागेल. लोकांची ते सतत फसवणूक करत आहेत.

बंगालमध्ये ज्या प्रकारे टीएमसी सरकार चालवत आहे, त्यामुळे बंगालची निराशा झाली आहे. पश्‍चिम बंगालच्या जनतेने मोठ्या अपेक्षेने टीएमसीला एवढा मोठा जनादेश वारंवार दिला आहे, पण टीएमसी हे अत्याचार आणि विश्‍वासघाताचे दुसरे नाव झाले आहे. तृणमूल काँग्रेससाठी बंगालचा विकास नसून भ्रष्टाचार आणि घराणेशाहीला प्राधान्य आहे असे मोदींनी म्हटले. सभेला संबोधित करण्यापूर्वी त्यांनी एका सरकारी कार्यक्रमादरम्यान पश्चिम बंगालमध्ये १५,००० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले.

# पंतप्रधान मोदी पुन्हा वाराणसीतून

## भाजपकडून १९५ उमेदवारांची घोषणा



नवी दिल्ली : लोकसभेच्या आगामी निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे आणि इतर प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत घोषणा केली. राष्ट्रीय अध्यक्ष, प्रदेशची निवडणूक समिती यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर अंतिम चर्चा ही २९ फेब्रुवारीला झाली.

यावेळी १६ राज्य आणि २ केंद्र शासित प्रदेशातील १४५ जागांचा निर्णय झाला. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसी येथून निवडणूक लढवणार आहेत. ३४ केंद्रीय मंत्री आणि राज्यमंत्री यांचे नाव या यादीत आहे. लोकसभा अध्यक्षांचे नाव आहे आणि एका माजी मुख्यमंत्र्यांचे नाव आहे. यामध्ये २८ मातृशक्ती (महिला), ५० पेक्षा कमी वयाचे ४७ युवा उमेदवार, अनुसूचित जाती २७, अनुसूचित जनजाती १८, ओबीसी ५७ अशा विविध वर्ग, समाज आणि जातींना या यादीत प्रतिनिधित्व देण्यात आले आहे, अशी माहिती विनोद तावडे यांनी दिली.

भौगोलिक क्षेत्र मोठे, प्रदेशात आम्ही मोठे, यासोबत एनडीएचा विस्तार करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. जनतेच्या आशीर्वादाने आम्ही सलग तिस-यांदा निवडून येऊ. गेल्या दोन निवडणुकांपेक्षा जास्त जागांवर आम्ही निवडून येऊ, असे विनोद तावडे म्हणाले.

उत्तर प्रदेशच्या ५५ जागांची आम्ही घोषणा करत आहोत, प. बंगालच्या २६, मध्यप्रदेश २४, गुजरात १५, राजस्थान १५, केरळ १२, तेलंगणा ९, आसाम १४ पैकी ११, झारखंड ११, छत्तीसगड ११, दिल्ली ५, जम्मू-काश्मीर २, उत्तराखंड ३, अरुणाचल प्रदेश २, गोवा १, त्रिपुरा १, अंदमान निकोबार १, दिव-दमन १, अशा १९५ जागांची आम्ही घोषणा करत आहोत, असे विनोद तावडे यांनी सांगितले.

वाराणसी येथून नरेंद्र मोदी, अंदमान निकोबार **(पान ७ वर)**

# राहुल गांधींना बॉम्बने उडवण्याची धमकी



नाशिक : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या बाबतीत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. राहुल गांधी यांना राजीव गांधींप्रमाणेच बॉम्बने उडवण्याची धमकी आली आहे. भारत जोडो न्याय यात्रेनिमित्त राहुल गांधी नाशिकमध्ये येणार आहेत. त्यासाठी नाशिक काँग्रेसकडून राहुल गांधींच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली जात असतानाच राहुल गांधींना बॉम्बने उडवून देण्याचा कॉल काही दिवसांपूर्वी नाशिक पोलिसांना आला. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

राहुल गांधी यांना बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा फोन नाशिक पोलीस आयुक्तालयात आठ दिवसांपूर्वी आला होता. त्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी चौकशी करत धमकी देणाऱ्याला ताब्यात घेतले आहे. तो माथेफिरू असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबतची माहिती नाशिक पोलिसांनी केंद्रीय तपास यंत्रणांना दिली असून संबंधित व्यक्तीवर पोलिसांची नजर कायम आहे.

याबाबत पोलीस निरीक्षक सुभाष पवार यांनी सांगितले की, आठ ते दहा दिवसांपूर्वी नियंत्रण कक्षात एक कॉल आला होता. राहुल गांधी यांच्या हत्येचा कट रचला गेला आहे. राजीव गांधींप्रमाणेच राहुल गांधींना बॉम्बने उडवून देऊ अशी धमकी देण्यात आली होती. या धमकीची गंभीर दखल घेत गुन्हे शाखा, दहशतवाद विरोधी पथक इतर शाखांनी याबाबत शहानिशा **(पान ७ वर)**

# तर त्या विद्यापिठांची मान्यता काढून घेणार




नाशिक : नाशिकमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आनंदशाळा समारंभाचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले उद्घाटन करण्यात आले. केबीटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी चंद्रकांत पाटील यांनी शिक्षण संस्थाचालकांना एक इशारा दिला. नवीन शैक्षणिक धोरणाची जूनपासून जे अंमलबजावणी करणार नाहीत त्यांची मान्यता विद्यापीठ काढून घेणार, असं ते म्हणाले. तुम्ही सुधरा, दम देत नाही पण प्रेमाचा सल्ला समजा, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**सुधरा नाहीतर कॉलेजेस बंद करा**

चंद्रकांत पाटील म्हणाले, पुण्यात फ्लेम युनिव्हर्सिटीत १३ लाख वार्षिक फी आहे, ॲडमिशन मिळत नाही तिथे माझ्यासारख्याची चिठ्ठी द्यावी लागते, ऐकत नाहीत. मालक शहा माझे मित्र आहेत. त्यांनी १०० एकरात **(पान ७ वर)**

# भारतीय ॲप्स् गुगुल प्ले वरून हटविले




नवी दिल्ली : गुगलने कित्येक भारतीय ॲप्सवर मोठी कारवाई केली आहे. शुक्रवारपासून हे ॲप्स आपल्या प्ले-स्टोअरवरुन हटवण्यास गुगलने सुरूवात केली होती. यामध्ये भारत मॅट्रिमॉनी, शादी डॉट कॉम, कुकू एफएम, अल्ट बालाजी अशा प्रसिद्ध ॲप्सचा देखील समावेश आहे. सर्व्हिस फी न दिल्यामुळे ही कारवाई केली जात असल्याचे गुगलकडून सांगण्यात आले.

कित्येक प्रस्थापित ॲप्सना प्ले-स्टोअरकडून भरपूर फायदा झाला आहे. मात्र त्यांनी सर्व्हिस फी दिलेली नाही असे गुगलने म्हटले. ही फी आधी १५ ते ३० टक्के एवढी होती. मात्र, अँटी कॉम्पीटिशन बॉडी सीसीआयने दिलेल्या आदेशांनंतर ही फी ११ ते २६ टक्के करण्यात आली होती. गुगलच्या प्लॅटफॉर्म फी बाबत कित्येक ॲप्सनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, कोर्टाने कंपन्यांना अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला. त्यानंतर गुगलने ही कारवाई केली आहे.

**भारतातील इंटरनेटसाठी काळा दिवस**

गुगलच्या या कारवाईवर भारतीय ॲप्सनी नाराजी व्यक्त केली आहे. गुगलने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक ॲप्स हटवण्यास सुरुवात केली असल्याचं कंपन्यांचे म्हणणे आहे. भारत मॅट्रिमॉनीचे फाऊंडर मुरुगावेल जानकीरामन यांनी हा दिवस भारतातील इंटरनेटसाठी काळा दिवस असल्याचे म्हटले. कुकू एफएमचे को-फाऊंडर विनोद कुमार मीना म्हणाले, की गुगल एका मोनोपॉलीप्रमाणे काम करत आहे. जीवनसाथीच्या इन्फो एज कंपनीचे संस्थापक संजीव **(पान ७ वर)**

# निवडणूक विषयक कामकाजास सर्वोच्च प्राधान्य

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नेमून दिलेल्या अधिकारी – कर्मचाऱ्यांनी त्यांची जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडावी. निवडणूक विषयक कामकाजास सर्वच नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी सर्वोच्च प्राधान्य द्यावे. विहित वेळेत कामे पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिले.

मुंबई शहर उपनगर जिल्हा कार्यालयात आज जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. क्षीरसागर यांनी मुंबई शहर उपनगर जिल्हा अंतर्गत चारही लोकसभा मतदारसंघासाठी नियुक्त निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह निवडणूक कामाशी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी अपर जिल्हाधिकारी गोहाड, उपजिल्हाधिकारी दादाराव दातकर व वंदना सूर्यवंशी, उपजिल्हाधिकारी शशिकांत काकडे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी तेजस समेळ, आदींची उपस्थिती होती. इतर अधिकारी हे दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

येत्या काही दिवसात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर होईल. या निवडणुकीत आचारसंहिता काळात सर्व नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर पथकाच्या स्थापना करावयाच्या आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक मनुष्यबळ आणि सर्व साधनसामुग्री संबंधित यंत्रणांना पुरविण्यात येईल असेही जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. क्षीरसागर यांनी सांगितले.

चारही लोकसभा मतदारसंघात १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवा मतदारांची नोंदणी करण्यावर भर देण्यात यावा. त्याचबरोबर मतदान जनजागृती मोहिमेच्या माध्यमातून मतदार संघातील प्रत्येक भागातील नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात यावे. मतदारसंघाचा विस्तार मोठा असल्याने कामकाजात अधिक गतिमानता आणणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचना आणि निर्देशाप्रमाणे **(पान ७ वर)**

# पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन करावे: संजय बनसोडे




लातूर / प्रतिनिधी- जिल्ह्यात गतवर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये पुरेशा प्रमाणात पाणीसाठा झालेला नाही. त्यामुळे काही भागात आतापासूनच पाणी टंचाई जाणवण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण पाणीसाठा लक्षात घेवून पाणी पुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत.

लातूर शहरातला पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पातील पाणीसाठा पिण्याकरिता आरक्षित करण्यात आला आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. लातूर शहर महानगरपालिकेनेया पाणीसाठ्यानुसार शहरातील पाणी पुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करावी. शहरी भागातील पाणीपुरवठ्यासाठी इतर पर्यायी उपाययोजना सज्ज ठेवाव्यात, असे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांनी सांगितले.

**(पान ७ वर)**

# महायुती सरकारमध्ये महिलांना संधी



बारामती : येथे विद्या प्रतिष्ठानच्या संस्थेत नमो महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, शरद पवार, सुप्रिया सुळे, नीलम गो-हे इत्यादी नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी राज्यातील अनेकांना रोजगार मिळावे यासाठी आम्ही प्रयत्न करत असल्याचे सांगितले आहे.

त्याचबरोबर महिलांनाही संधी देण्याचे काम महायुती सरकार करत आहे, असेही अजित पवार यावेळी म्हणाले.

अजित पवारांनी यावेळी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उशीर होणार होता. पोलिसांच्या ताफ्यात नवीन ३९ गाड्या दाखल झाल्या आहेत. याचा शुभारंभ गाड्यांना हिरवा झेंडा दाखवून मी केला. तिथे ३९ वाहनांमध्ये जे ड्रायव्हर होते, त्याच्यात १४ महिला होत्या. सर्वांत चांगले काम त्यांचे सुरू होते. महिलांना संधी देण्याचे काम महायुती सरकार करत आहे, असेही यावेळी अजित पवार म्हणाले.

आज करोडो कामे बारामतीकरांसाठी करण्यात येत आहेत. अशा प्रकारे टप्प्याटप्प्याने पुढे जात राहू. एक दिवस विकासाच्या बाबतीत राज्यात बारामती तालुका एक नंबर असेल असा विश्र्वास यावेळी अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

देश-विदेशात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध आहेत. त्या संधीचे सोने करायचे आहे. आधीच्या बारामतीत आणि आताच्या बारामतीत मोठा फरक झाला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना अजित पवारांनी बारामतीत झालेल्या बदलांची **(पान ७ वर)**

# पत्रकारांनी समाजाच्या प्रश्नांची काळजी घ्यावी आरोग्याची काळजी मी घेतो: आ. रमेश कराड




लातूर दि.०२- लोकशाहीत समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यात पत्रकारांचे मोठे योगदान आहे. पत्रकारांनी समाजाच्या सर्वांगीण प्रश्नांची काळजी घ्यावी. जिल्ह्यातील पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून आरोग्य सुरक्षा कवच देऊन मी घेतो असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

व्हॉइस ऑफ मीडिया आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्ह्यातील पत्रकारांच्या आरोग्य शिबिराचा शुभारंभ आणि आयुष्यमान भारत आरोग्य कार्डचे वितरण आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते शनिवारी झाले.

यावेळी व्हाईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, एमआयटी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजय चोरडिया, मराठवाडा संघटक बालाजी फड, लातूर जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, इलेक्ट्रॉनिक्स विभाग अध्यक्ष निशांत भद्रेश्र्वर, साप्ताहिक विभाग अध्यक्ष विष्णू अष्टेकर, शैक्षणिक विभाग अध्यक्ष चेतन कात्रे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना **(पान ७ वर)**



# औसा पॅटर्न मराठवाड्यात मॉडेल म्हणून उदयास येत आहे

औसा - विकासाच्या प्रश्नावर आमदार अभिमन्यू पवार यांनी पक्षभेद कधी ठेवला नव्हता. कुठलाही प्रश्न आला की ते फोन करायचे. त्यांच्या रुपाने योग्य लोकप्रतिनिधी लोकांनी निवडल्याचे जाणवले. या पदाला न्याय देणारा हा आमदार आहे. राजकारणात समाजकारण आलं पाहिजे. ९० टक्के समाजकारण आणि १० टक्के राजकारण करणारे आमदार अभिमन्यू पवार यांच्या कामाचा झपाटा, वरिष्ठांकडे असलेले वजन आणि त्यांनी निर्माण केलेला औसा पॅटर्न मराठवाड्यात मॉडेल म्हणून उदयास येत असल्याचो गौरवोद्गार माजीमंत्री बसवराज पाटील यांनी काढत आमदार अभिमन्यू पवार पुन्हा मोठ्या मताधिक्याने निवडून येतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

माजीमंत्री बसवराज पाटील यांनी भाजप पक्षात प्रवेश घेतल्यानंतर (दि.२) मार्च रोजी औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी त्यांचा भाजप पदाधिकाऱ्यांसह जावून सत्कार केला यावेळी स्वागत कार्यक्रमात दोघांनीही एकमेकांचे तोंडभरून कौतुकही केले. यावेळी बोलताना बसवराज पाटील यांनी आमदार पवारांच्या कामाचा झपाटा, औसा पॅटर्नचा उल्लेख करत ते पुन्हा मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला. माझ्यासाठी हे स्वागत म्हणजे कौटुंबिक कार्यक्रम आहे. आपण एकाच कुटुंबातील सदस्य आहोत. **(पान ७ वर)**

# वैद्यकीय महाविद्यालयात जेनेरिक औषधे मिळणार

मुंबई : गेल्या काही वर्षात ब्रँडेड औषधाच्या तुलनेत जेनेरिक औषधे बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहेत. जेनेरिक औषधे ही ब्रँडेड औषधाच्या तु-लनेने अधिक स्वस्त असतात त्यामुळे गरीब रुग्णांना परवडतात. विशेष म्हणजे या औषधाची गुणवत्ता सुद्धा चांगल्या प्रकारची असल्यामुळे केंद्र सरकार जेनेरिक औषधांचा मोठ्या प्रमाणत प्रसार करत आहे. त्यामुळे आता राज्यातील बहुतांश सर्वच वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालयात जेनेरिक औषधाची दुकाने सुरु करण्यास वैद्यकीय शिक्षण विभागाने परवानगी दिली आहे. यासाठी त्यांच्या मार्फत तीन कंपन्यांची निवड करण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षात औषधनिर्माण शास्त्रात मोठी प्रगती झाली आहे. तसेच अनेक रुग्णांना काही औषधे ही आयुष्यभरासाठी घ्यावी लागतात. त्यामध्ये विशेष करून रक्तदाब, मधुमेह, हृद्यविकार तत्सम आजरांचा समावेश असतो. त्यासोबत थंडी, खोकला, ताप या नियमित आजरांसाठी रुग्ण नियमितपणे बाजारातून औषधे घेत असतात. अनेक रुग्णांना यासाठी मोठा खर्च होतो. सध्याच्या घडीला बहुतांश आजारावरील जेनेरिक औषधे आता बाजरात उपलब्ध झाली आहेत. विशेष म्हणजे ही औषधे ब्रँडेड औषधाच्या तुल-नेत अधिक स्वस्त असतात.

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेकांचा समज असतो कि जेनेरिक औषधे ही उपचारासाठी जास्त प्रभावी नसतात. मात्र तो समज पूर्णपणे चुकीचा आहे. ब्रँडेड आणि जेनेरिक औषधांमध्ये समान औषधी घटक असतात. त्यामुळे दोन्ही प्रकारची औषधे ही प्रभावीच असतात.

दैनिक
यशवंत
अहमदपूर/चाकूर परिसर
रविवार दि.०३ मार्च २०२४


E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

# आज येस्तार येथे सेवापुर्ती गौरव व माजी विद्यार्थी मिलन सोहळ्याचे आयोजन

अहमदपूर दि.०२(कारामुंगीकर) येथुन जवळच असलेल्या येस्तार येथे सेवापुर्ती गौरव व माजी विद्यार्थी स्नेह मिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आज दि. ३ मार्च २०२४ रोजी करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर तालुक्यातील येस्तार येथील साने गुरुजी विद्यालयात लिपिक पांडे किरण गोपाळराव यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा व माजी विद्यार्थी यांच स्नेह मिलन सोहळयाचे आयोजन आज दि. ३ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता साने गुरुजी विद्यालय, येसीर येथे करण्यात आले असुन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सपरंच वच्छलाबाई शिवराम ढाकणे या उपस्थित राहणार असुन यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन शिक्षण महर्षि, दलित मित्र डी. बी. लोहारे गुरुजी, एस.एस.एम. प्रतिष्ठानच्या सचिव प्रा. डॉ. सुनिताताई चवळे उपस्थित राहणार आहेत. यावेळी शाळेतुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी यांच्या वतिने करण्यात आले आहे.

# आई-वडील म्हणजे काय तर...? अडचणीच्या वेळी कामी येणारे फिक्स डिपॉझिट असतात

## उपप्राचार्य अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दुर्गादास चौधरी यांनी कवितेतुन केल्या भावना व्यक्त

अहमदपूर दि.०२(कारामुंगीकर) आई - वडील म्हणजे काय असतात...? हे नमूद करून - त्यांना जपायचं असतं. आईच प्रेम हे रोजच्या आयुष्यात कामाला येणारं बँक बॅलन्स असतं तर वडील म्हणजे अडचणीच्या वेळी कामी पडणारे फिक्स डिपॉझिट असतात. म्हणून त्यांना जपायचं असतं. या भावस्पर्शी कवितेतून कविसंमेलनाची रंगत अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे उपप्राचार्य, आयक्यूएसी समन्वयक तथा अर्थशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. दुर्गादास चौधरी यांनी वाढवली.




याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे व मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या मकवी संमेलन व कथाकथन म कार्यक्रम प्रसंगी त्यांनी आपली कविता सादर केली.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील होते तर विचार मंचावर शीघ्र कवी , उपप्राचार्य तथा आय क्यू ए सी समन्वयक डॉ. दुर्गादास चौधरी ,कवी डॉ. डी . एन . माने , ज्येष्ठ कवी डॉ. मारोती कसाब , प्रा कल्पना कदम , अजय मुरमुरे, वैष्णवी मुंढे, सत्यशीला स्वामी , वनिता नरवटे , प्रतीक्षा राठोड यांच्यासह कार्यक्रमाचे संयोजक प्रो. डॉ. अनिल मुंढे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे आपली कविता सादर करताना डॉ. चौधरी म्हणाले की-

मकाही शब्द बडबडले
आणि कवी हे घडले... !
काही शब्द घडले
आणि बिघडले... !!
कवितेचे बी असेच रुजले...!
नव भाव-भावनांनी ,
मोह बंधनांनी,
नवस्पंदनाच्या नवचेतनांनी
कवी घडले...!! म

या आशयाची कविता सादर करून उपस्थित त्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी कवी डॉ. डी. एन. माने यांनी-

मपोरी पूर्वी,
डोयीवर पदर
अन्
फाटकाच का असेना
अंगभर
कपडा असायचा...!
अन्
लाजणार्या नजरेला
आपुलकीचा मान
असायचा...!

पोरी या कवितेतून भारतीय संस्कृती विसरत चाललेल्या मुलींना जुन्या काळातील मुलींची आठवण करून दिली. तर विद्रोही कवी मारोती कसाब यांनी -

मशिवराय तुम्ही
पुन्हा जन्मा यावे!
राज्य सावरावे
रयतेचे !!
गुंड पुंड पुन्हा ।
माजले दलाल
झाले मालामाल
रातोरात ।।
माजले मवाली ।
तुम्ही गेल्यावर
झाले शिरजोर
गावगुंड ।।

या शिवराया तुम्ही तिच्या माध्यमातून सामाजिक विषमता दूर करण्यासाठी व पुन्हा रयतेचे राज्य निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांना पुन्हा जन्म घेण्याचे साकडे घातले.

अजय मुरमुरे यांनी मझोपडी म या कवितेच्या माध्यमातून गरीबीच जीवनाचे वास्तव चित्रण केलं. या बरोबरच प्रा.कल्पना कदम यांनी ममायफ कवितेच्या माध्यमातून आई बद्दलच्या भावना व्यक्त करताना म्हणाल्या की-

सहज नजर फिरविली
पाहते तर काय ?
साठीच्या संसाराची माय
मनाच्या देव्हाऱ्यात सहजच
शिरली

ही कविता सादर करून गंभीर केले. प्रतीक्षा राठोड या कवयित्रीने मसुंदर अश्रु या कवितेतून आपल्या भावभावना व्यक्त केल्या. वनिता नरवटे या कवयित्रीने महोय मी चंद्रभागा बोलतेय ! या कवितेतून प्रदूषित होत असलेली मचंद्रभागाफ आणि नि:ष्प्रभ ठरलेल्या पांडुरंगाचेफ बोलके वर्णन साकरले. वैष्णवी मुंढे यांनी मबाया या कवितेच्या माध्यमातून स्त्री जीवनाचा वास्तव आलेख मांडलं तर सत्यशीला स्वामी यांनी-

आयुष्याचा प्रत्येक क्षण जगा,
आज आहोत पण उद्या नसू,
आपल्याला जे वाटतं...
तेच घडत असतं
असं काही नसतं ,
डजेस्टमेंट हेच
आयुष्य असतं.

हे मअंतिम सत्य आजच्या जीवनाचा वास्तव मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक ह . भ. प . प्रो. डॉ. अनिल मुंढे यांनी केले तर; सूत्रसंचलन डॉ. बब्रुवान मोरे यांनी व आभार डॉ. मारोती कसाब यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# ज्ञानेश्वर विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा




अहमदपूर दि.०२(कारामुंगीकर) संत ज्ञानेश्वर विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले.भारतात प्रतिवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रमन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो.वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी मराष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्याफ अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे तर उद्घाटक म्हणून संस्थेच्या उपाध्यक्षा अँड. मानसी ताई हाके पाटील, मुख्याध्यापक मीना तोवर सह मान्यवर उपस्थित होते.
प्रारंभ सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आयोजित विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध प्रयोगाचे सादरीकरण करून माहिती दिली. सहभागी विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक युवराज मोरे व वैष्णवी शिंगडे यांनी मार्गदर्शन केले. सदरील विज्ञान प्रदर्शनाचे निरीक्षण मीना तोवर व युवराज मोरे यांनी केले. यातून प्रथम - नोमान शेख व अल्तमश शेख, द्वितीय - वेदांत कलवले, तृतीय -आर्यन आरदवाड व स्वराज मोरे यांच्या प्रयोगाची निवड करून त्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# कोंडीबा हारगिले, सुशांत शिंदे, प्रविन माने यांचा लसाकमच्या वतिने सत्कार

अहमदपूर दि.०२(कारामुंगीकर) कोंडीबा शिवराज हारगिले, सुशांत शंकर शिंदे, प्रविन पुंडलिक माने यांची जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक म्हणुन निवड झाल्याबद्दल लहुजी साळवे कर्मचारी महासंघ शाखा अहमदपूरच्या वतिने सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, पवित्र प्रणाली मार्फत नुकतीच शिक्षक पदभरती करण्यात आली आहे. या शिक्षक भरती मध्ये शहरातील प्रविण माने यांची जालना येथे शिक्षक म्हणुन निवड झाली आहे. तर कोंडीबा हारगिले यांची सांगली येथे, सुशांत शिंदे यांची सातारा - कराड येथे शिक्षक म्हणुन निवड झाली आहे. त्याबद्दल लहुजी साळवे कर्मचारी महासंघाच्या वतिने सत्कार करण्यात आला.



अध्यक्षीय समारोपात डॉ. प्रमोद सांगवीकर यांनी पवित्र पोर्टल मार्फत निवड झालेले शिक्षक हे गुणसंपन्न आहेत असे मत व्यक्त केले. निवड झालेल्या शिक्षकांनी स्पर्धापरीक्षेव्दारे उच्च पद प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा तसेच भावी पिढीला घडविण्यासाठी प्रयत्नपूर्वक प्रामाणिक कार्य करावे. असे सांगत त्यांनी भावी शिक्षकांना सुसंस्कृत राष्ट्रनिर्मितीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. प्रमोद सांगवीकर हे उपस्थित होते. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. गंगाधर साखरे, रमेश भालेराव, डॉ. बालाजी कारामुंगीकर, सरपंच शिवाजी तरुडे, सतिष नामपल्ले, चंद्रकांत जंगापल्ले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बालाजी कारामुंगीकर यांनी केले. सुत्रसंचलन भरतकुमार गायकवाड यांनी केले. यावेळी शंकर शिंदे, शिवराज हारगिले, सौ. सुप्रिया कारामुंगीकर, सौ. कांचन गायकवाड, कोटंबे किरण आदींची उपस्थिती होती.

# त्यागमूर्ती रमाई म्हणजे समाजासाठी त्याग व समर्पण होय- प्रा बालाजी आचार्य

अहमदपूर दि.०२(कारामुंगीकर) त्यागमूर्ती रमाई म्हणजे समाजासाठी त्याग व समर्पण होय असे प्रतिपादन प्रा. बालाजी आचार्य यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ बाबासाहेब आंबेडकर ज्ञानार्जनासाठी सतत पुस्तकांच्या सहवासात असायचे शिक्षण आणि समाजाचे उन्नती हाच ध्यास त्यांच्या मनात होता त्यामुळे पत्नी रमाई मुलं गंगाधर राजरत्न इंदूर रमेश यांच्याकडे लक्ष देता आले नाही त्यावेळी प्रज्ञासूर्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणारी त्यागमुर्ती रमाई म्हणजे समाजासाठी त्याग व समर्पण होय असे प्रतिपादन व्याख्याते प्रा बालाजी आचार्य यांनी मोजे चिखली ता अहमदपूर येथील आयोजित माता रमाईच्या १२५ व्या जयंतीच्या निमित्ताने मंगळवार दि२७ फेब्रुवारी २०२४ रोजी व्याख्यान देताना केले या जयंतीचे आयोजन महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच संभाजी गायकवाड प्रमुख व्याख्याते प्रा बालाजी आचार्य तर प्रमुख उपस्थिती पोलीस पाटील संग्राम बरुरे , ग्रा प सदस्य यशवंत मुंडे ,सुभाष गायकवाड , प्रा राहुल गायकवाड ,संभाजी ढवळे , प्रशांत गायकवाड ,गोरख गायकवाड , विनायक क्षीरसागर ,,पंढरी क्षीरसागर , भानुदास गायकवाड , किशन चाटे , दगडू ओठले , राहूल क्षिरसागर ,रणजीत गायकवाड , एकनाथ गायकवाड आदींची होती.





कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत भगवान बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर, त्यागमूर्ती रमाईच्या प्रतिमेचे पूजन मान्यवराच्या शुभहस्ते करून पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रस्ताविक संयोजन समितीच्या अध्यक्षाअरुणाबाई गायकवाड यांनी केलेनंतर पुढे बोलताना प्राध्यापकाचार्य म्हणाले की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रदेशा शिक्षण घेण्यासाठी गेले असता माता रमाईने उपास कोठे दिवस काढले दुःख सहन केले भाकरी पेक्षाशील व चारित्र्याला महत्त्व दिले बाबासाहेबांच्या पत्रात बाबासाहेबांना पत्रात लिहिले साहेब तुम्ही शिकून मोठे व्हा शरीराचे पणती आणि डोक्याचे वात करून मी तुमच्यासाठी उभी राहील तुमच्या प्रमाणे दीनदुबळ्या रंजल्या गांजल्याचा संसार सुखी झाल्याचे पाहायला आवडेल तुम्ही देशाला नवा प्रकाश देण्याचा प्रयत्न करा तुमच्या पाठीशी मी खंबीर उभे राहील तुम्ही समितीची लढाई जिंका अशी प्रेरणा देऊन माता रमाईने बाबासाहेबांना आधार दिला असे सांगून रमाई आणि बाबासाहेब यांच्या जीवनातील प्रसंगावधानाने भावनिक केले यावेळी संग्रह मरुरे यांनी मनोगत व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोप संभाजी गायकवाड यांनी केला शेवटी आभार हौसाबाई क्षीरसागर यांनी मानले रमाई जयंतीच्या यशस्वीतेसाठी अरुणाबाई गायकवाड, दैवशाला गायकवाड , हौसाबाई क्षीरसागर , पार्वती गायकवाड ,महानंदा ओठले . सारिका गायकवाड , सुमन गायकवाड , सुजाता जाधव , गोदावरी क्षिरसागर , सुनीता शिंदे ,केवळबाई गायकवाड ,सागरबाई ओठले मंदोदरी गायकवाड ,निलावती गायकवाड, सुमनबाई गायकवाड ,अनुसया गायकवाड, मायाबाई गायकवाड ,शोभा गायकवाड ,सुलोचना गायकवाड , लक्ष्मी गायकवाड , रेखा कांबळे , अनिता वाघमारे, मीना गायकवाड आदींनी घेतले उपासक - उपासिका उपस्थित होते.

# हाडोळती येथे ग्रामपंचायत सदस्य महामुद पठाण यांच्या तर्फे स्व:खर्चाने मोफत टँकर ने पाणी वाटपास सुरूवात

हाडोळती दि.०२(नागसेन गायकवाड) हाडोळती येथे ग्रामपंचायत सदस्य महामुद पठाण यांच्या तर्फे स्व:खर्चाने मोफत टँकर ने पाणी वाटपास सुरूवात केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, हाडोळती ता.अहमदपूर येथे जवळपास दोन महिन्यापासून ग्रामपंचायत चा पाणीपुरवठा बंद आहे. त्याचे अनेक कारणे आहेत कधी पाणी कर तर कधी लाईट बिल आणि आता पाणी आहे पण आपल्या मोटारी जवळ नाही असे अदृश्य,अस्पष्ट कारणे आहेत.



वॉर्ड क्रमांक १ मध्ये स्वखर्चातून टँकरने मोफत पाणीपुरवठा करुन तात्पुरती पाण्याची अडचण सोडवण्याचा प्रयत्न ग्रा.प.सदस्य महामुद पठाण करत आहेत. ग्रामपंचायत सदस्य महामुद चांदखां पठाण व सहकारी ग्रामपंचायत सदस्य रज्जाक पाशामिया शेख* यांनी वॉर्ड क्रमांक १ च्या जनतेच्या विश्वासाच्या बळावर पदभार स्वीकारला होता. त्या विश्वासाला तडा जाऊ नये म्हणून महामुद पठाण यांच्यातर्फे मोफत टँकर ने पाणी वाटप सुरू करण्यात आले. त्यांच्या या स्त्युत्य समाजपयोगी कार्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# महाविद्यालयीन तरुणांनी आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी ध्येय निश्चिती करावी - प्राचार्य डॉ.वसंत बिरादार

अहमदपूर दि.०२(कारामुंगीकर) आजचे तरुण सोशल मीडियाचा अतिरेकी वापर करून आपल्या ध्येयापासून विचलित होत आहेत. युवकांनी अनावश्यक बाबींचा मनादफन करता आपले ध्येय ठरवावे व उज्ज्वल भविष्याचा वेध घ्यावा आणि करिअर करावे असे, विद्यार्थ्यांना आवाहन प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी केले.


याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेह संमेलनाच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ . वसंत बिरादार पाटील बोलत होते.यावेळी उपप्राचार्य तथा आय क्यू ए सी समन्वयक प्रो. डॉ. दुर्गादास चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी डॉ. दिगंबर माने यांच्यासह विचार मंचावर स्नेह संमेलनाचे प्रभारी प्राध्यापक प्रो. डॉ . अनिल मुंढे डॉ . सतीश ससाणे , विद्यार्थी प्रतिनिधी कु. वैष्णवी मुंढे आदींची उपस्थिती होती.




यावेळी पुढे बोलतांना प्राचार्य डॉ .वसंत बिरादार पाटील म्हणाले की , तरुणांनी विद्यार्थी अवस्थेत मित्र मैत्रिणी तात्पुरते ठीक आहेत पण त्याही पेक्षा आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करावे व त्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत. कारण, आज विविध क्षेत्रांमध्ये फार मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे,असे ही ते म्हणाले.यावेळी उपप्राचार्य प्रो डॉ . दुर्गादास चौधरी यांनी व प्रसिद्ध कवी डॉ. दिगंबर माने यांनी प्रबोधनात्मक कवितेच्या माध्यमातून सद्य: स्थितीची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. या स्नेह संमेलनाप्रसंगी विविध गुणदर्शनच्या कार्यक्रमासह , संगीत व साधे शेलापागोटे तसेच विविध वाड्:मयीन स्पर्धा , क्रीडा स्पर्धा आदींचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प. प्रो. डॉ . अनिल मुंढे यांनी केले तर सूत्रसंचलन डॉ. बब्रुवान मोरे व आभार प्रा. डॉ. पांडुरंग चिलगर यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# कबीरवाणी

**सज्जन को सज्जन मिलैं,**
**होवे दो-दो बात।**
**गदहा सो गदहा मिलै,**
**खावे दो-दो लात ।**



**भावार्थ** : एखाद्या सज्जन व्यक्तीस दुसरी सज्जन व्यक्ती जर मिळाली तर त्यांच्या चांगली चर्चा होते, बातचीत होते. मात्र गाढवाला दुसरे गाढव जर का मिळाले तर ते परस्परांना लाथा मारत बसतील. याचाच अर्थ दुर्जन जर एकत्र आले तर एकमेकांच्या चुका काढुन भांडत बसतील सज्जन व्यक्तीं बाबत कबीरांनी हे सुंदर विचार सांगितले आहेत.

**डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

# यशवंत धाराशिव जिल्हा

रविवार दि. ०३ मार्च २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेसाठी समितीने घेतली अर्थमंत्री पवार यांची भेट



धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – निम्न तेरणा संघर्ष समितीने निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेसाठी निधीला तत्काळ मंजुरी द्यावी अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. यावेळी पवार यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

गोदावरी पाठबंधारे महामंडळाअंतर्गत माकणी येथील २३ गावांना लाभ देणाऱ्या या योजनेचा प्रस्ताव तयार असून या गावातील शेतकऱ्यांनी एकमुखी मागणी केली आहे . धाराशिव तालुक्याचा संजीवनी ठरणारी ही योजना गेली अनेक वर्षापासून बंद आहे. यामुळे या भागात कायम दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे . संबंधित बाबी लक्षात आणून दिल्यानंतर अर्थमंत्र्यांनी या विशेष दुरुस्तीला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. यावेळी जगदीश पाटील, अण्णासाहेब क्षीरसागर, अरुण कोळगे, दीपक सूर्यवंशी, किशोर पाटील, अमर माने, सचिन सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

# पहाट कार्यक्रमास गुन्हेगारांसह पारधी बांधवांचा प्रतिसाद

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील गुन्हेगारीकडे वळलेल्या पारधी समाजबांधवांना गुन्हेगारीपासून परावृत्त करुन मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पहाट उपक्रमाचे दि.२ मार्च रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयातील अलंकार सभागृहात आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आदिवासी पारधी समाजाला गुन्हेगारीपासून परावृत्त करण्याचे काम जिल्हा पोलीस दलामार्फत करण्यात येत आहे. तर शेती असणाऱ्या समाजबांधवांना विविध फळबाग, पिके लागवडी व शासनाच्या योजनांची माहिती. तसेच शेती नसणाऱ्या समाजबांधवांना राज्य व केंद्र शासन यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत माहिती पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितली. ज्यांच्याकडे आधार कार्ड नाही अशा आदिवासी पारधी बांधवांना शासनामार्फत आधार कार्ड व इतर कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याचे काम सुरु आहे. तसेच पुढील हप्त्यात आम्ही मोटर रोजगार मेळावाचे आयोजन करणार आहे जेणेकरुन गुन्हेगारांना बाहेर काम मिळाले पाहीजे. यापुढेही आपण आदिवासी पारधी समाजातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे याकरीता पीडीवर शाळा सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कृषी विभागाचे लेणेकर, आदिवासी विभागाचे सरतापे, ॲड उबंरे, आधार कार्ड विभागाचे अनिकेत मुडके, ग्लोबल विकास ट्रस्टचे सुतार आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, कृषी विभाग लेणेकर, अधिकारी कर्मचारी व ५७ गुन्हेगार उपस्थित होते.



## आज पत्रकारांचा अपघात विमा व आयुष्यमान भारत कार्ड योजना कार्डचे वाटप होणार


धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – व्हाईस ऑफ मीडिया या जागतिक पत्रकार संघटनेच्यावतीने धाराशिव जिल्ह्यातील पत्रकारांचा अपघात विमा व आयुष्यमान भारत योजना कार्ड वाटप कार्यक्रमाचे आयोजन दि. ३ मार्च रोजी करण्यात आले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील पत्रकारांचा अपघात विमा व आयुष्यमान भारत कार्ड योजना वाटप करण्यासाठी व्हॉईस ऑफ मीडियाने गेल्या वर्षापासून प्रारंभ केला आहे. गतवर्षी या योजने अंतर्गत जिल्ह्यातील २५० पत्रकारांचा अपघात विमा उतरविण्यात आला होता. त्याची मुदत संपली असून यावर्षी या अपघात विमा बरोबरच आयुष्यमान भारत कार्डचे देखील वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून आमदार कैलास पाटील व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धिविनायक उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर, माजी नगराध्यक्ष मकरंदराजे निंबाळकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष धीरज पाटील

व व्हाईस ऑफ मीडियाच्या राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले आदी उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम धाराशिव शहरातील सांजा रोडवरील बीएसएनएल ऑफिस समोरील आर्यन फंक्शन हॉलमध्ये सकाळी ९ वाजता सुरू होणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे, असे आवाहन व्हाईस ऑफ मीडियाच्यावतीने करण्यात आले आहे.

## माणिकराव बोधले यांचे निधन

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – शहरातील जुनी गल्ली येथील माणिकराव मारुती बोधले यांचे दि.२ मार्च रोजी पहाटे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पांढरी स्मशानभूमीत दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. माणिकराव बोधले हे शेतकरी कामगार पक्षातील धडाडीचे कार्यकर्ते होते. पक्षाचे जिल्हा सरचिटणीस म्हणूनही त्यांनी काम पाहिले. भाई उद्धवराव पाटील यांच्यासमवेत त्यांनी काम केले होते. दिवंगत न्यायमूर्ती बॅ.बी.एन. देशमुख यांचे स्वीय सहायक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. भोगावती सहकारी साखर कारखान्यातून सेवानिवृत्तीनंतर त्यांनी शेतकरी कामगार पक्षासाठी आयुष्य वेचले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. नगर परिषदेचे कर्मचारी पवन बोधले यांचे ते वडील होते.



## महाशिवरात्री निमित्त वडगाव सि. येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

धाराशिव, दि. २ (प्रतिनिधी) – तालुक्यातील वडगाव (सि.) येथे महाशिवारात्रीनिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन दि.६ ते १० मार्च दरम्यान करण्यात आले आहेत.

यामध्ये दि. ६ मार्च रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत भक्तीनाद भजन संध्या तर रात्री ९ ते ११ दरम्यान हभप अक्षय शेळके महाराज यांच्या किर्तनाचा कार्यक्रम होईल. गुरुवार, ७ मार्च रोजी सायंकाळी ६ ते ८ दरम्यान सारोळा येथे दिपश्री संगीत एकॅडमी यांचा संगीत भजनाचा कार्यक्रम. रात्री ९ ते ११ हभप ज्ञानेश्वर पुरी महाराज यांचे किर्तन तर रात्री १२ ते २ या वेळेत संगीत भजनाचा कार्यक्रम होईल.

महाशिवरात्री दिनी दि.८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता श्री सिध्देश्वराच्या पालखीचे गावात सभा मंडपामध्ये आगमन, सकाळी ८ ते १० शिवलिलामृत (शिवरात्री महात्म्य) ग्रंथ वाचन, ११ ते ५ भारूडाचा भरगच्च कार्यक्रम, सायंकाळी ७ ते १० श्री सिध्देश्वर महाराजांच्या पालखीची गावात सवाद्य मिरवणूक काढण्यात येऊन सिध्देश्वर मंदिराकडे प्रस्थान होईल. त्यानंतर रात्री १२:१५ वाजता शोभेची दारू व नंतर श्री. सिध्देश्वर मंदिरामध्ये जागर होईल. वरील सर्व कार्यक्रम हे गावातील सभामंडपात होतील. तसेच दि.९ मार्च रोजी दुपारी २ ते ६ वेळेत सिध्देश्वर मंदिरासमोरील मैदानात कुस्त्यांचे जंगी कार्यक्रम तर रात्री ९ ते १२ या वेळेत ऑर्केस्ट्रा : नार नखरेवाली हा कार्यक्रम होणार आहे. तर दि. १० मार्च रोजी हभप बालाजी बोराडे महाराज यांचा



किर्तन कार्यक्रम मंदिरात होणार आहे. या कार्यक्रमास वडगाव सि. व परिसरातील भाविक – भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्री सिध्देश्वर मंदिर देवस्थान व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

## महासंस्कृती महोत्सवात आरोग्य केंद्र व ॲम्बुलेंसची व्यवस्था




धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – जिल्हा महासंस्कृती महोत्सवास दि.२९ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी सचिन ओंबासे व जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते उद्घाटन करुन सुरुवात झाली.

या महोत्सवात पर्यटन स्थळे विषयक माहिती चित्र प्रदर्शन, शिवकालीन शस्त्रे व फोटो पोलीस विभागाचे रायफल प्रदर्शन, महिला बचत गट, विविध विभागांचे स्टॉल, खाद्य पदार्थ स्टॉल भरविण्यात आले आहे. मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. ५ दिवस चालणाऱ्या या उत्सवात प्राथमिक आरोग्य केंद्र व ॲम्बुलेंसची व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य केंद्रास रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतिफ अब्दुल मजीद व ईथीकल कमिटी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सदस्य गणेश वाघमारे यांनी भेट दिली. आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, सिस्टरसह यंत्रणेची माहिती घेतली. आलेल्या नागरिकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. तर सदर कर्तव्य बजावत असणा-या कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या यात रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतिफ अब्दुल मजीद, ईथिकल कमिटी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सदस्य गणेश वाघमारे, लहुजी पॅंथर जिल्हाध्यक्ष देवानंद एडके, पर्यटन विकास समितीचे कोषाध्यक्ष बाबासाहेब गुळीग, सदस्य राजाभाऊ कारंडे, साहित्यिक लेखक विजय गायकवाड वैद्यकीय अधिकारी, ब्रदर ॲम्बुलेंस चालक आदी उपस्थित होते.

## युनिटी मल्टीकॉन प्रा लि हे शालेय विद्यार्थ्यांसाठी एक मोठी प्रेरणा - शिवाजीराव मोरे

नळदुर्ग दि.२ (प्रतिनिधी) – १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या युनिटी मल्टीकॉन्स कंपनीच्यावतीने नळदुर्ग व परिसरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी व त्यांची बुद्धी तल्लक व्हावी या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थांची गुणवत्ता वाढावी हा दृष्टिकोन मनाशी बाळवून निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यामध्ये शेकडो विद्यार्थ्याने सहभाग नोंदविला होता. युनिटी मल्टीकॉन गेल्या अनेक वर्षांपासून विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यांना प्रेरणा दिली जाते केवळ विद्यार्थ्यांसाठी नाही तर संपूर्ण शहरासाठी आणि शहरातील सर्वच विद्यार्थ्यांसाठी यूनिटी मल्टीकॉन ही प्रेरणादायी आहे असे परखड मत माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य शिवाजीराव मोरे यांनी केले .



नळदुर्ग शहरात नुकताच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धांचे निकाल जाहीर होताच स्पर्धाच पारितोषिक वितरण सोहळा नळदुर्ग ऐतिहासिक किल्लयामध्ये बारादरीमध्ये आयोजित करण्यात आलेला होता. त्या वेळेस ते बोलत होते. या कार्यक्रमाचे नियोजन युनिटी मल्टीकॉन कंपनीचे कार्यकारी संचालक कपिल मौलवी संचालक जय धवल करमरकर संचालक वैशालीताई जैन यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीचे जनसंपर्क अधिकारी विनायक अहंकारी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक नळदुर्ग नगरीचे माजी नगराध्यक्ष शहबाज काझी यांनी केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष नितीन कासार, माजी उप नगराध्यक शफीभाई शेख, माजी नगराध्यक्ष मुस्ताक कुरेशी ,माजी नगरसेवक बसवराज धरणे, भाजपचे नेते सुशांत भुमरकर , माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण , डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल चे संस्थापक अध्यक्ष मारुती खारवे, पत्रकार विलास येडगे, शिवाजी गायकवाड, काँग्रेसच्या तालुका महिला आघाडी प्रमुख सुभद्राताई मुळे, काँग्रेसच्या महिला आघाडी शहर अध्यक्षा कल्पनाताई गायकवाड, शिवसेनेचे ज्ञानेश्वर घोडके, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन भैरवनाथ कानडे, शोएब काझी आदीजन उपस्थित होते.

निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या. निबंध स्पर्धा पारितोषीक प्रथम क्रमांक कदम संस्कृती. द्वितीय घोडके मयुरी, तृतीय पवार ज्ञानेश्वरी, चतुर्थ महेक पठाण, पाचवा जगताप आकांक्ष, उत्तेजनार्थ शांभवी संतोष. तर चित्रकला स्पर्धा प्रथम क्रमांक तुळशी मुरमुरे, द्वितीय क्रमांक जानकी माताडे, तृतीय क्रमांक ज्ञानेश्वरी माळी, चौथा क्रमांक पूजा सगर, पाचवा क्रमांक कुताळे श्रुती, उत्तेजनार्थ अलिफा अफजल या विजेत्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक सन्मानचिन्ह व सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन विजेत्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन माजी नगरसेवक तथा कंपनीचे जनसंपर्क अधिकारी विनायक अहंकारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी करण्यासाठी यूनिटी मल्टीकॉन्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बसवराज पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे मुरूम शहरात जंगी स्वागत

मुरूम दि.२ (प्रतिनिधी) – महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय असणारे बसवराज पाटील यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन कमळ हाती घेतल्यानंतर प्रथम मुरूम शहरात आगमन होताच त्यांचे शहर व परिसरात पदाधिकारी व कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने दि.१ मार्च रोजी शहरात आगमन होताच जंगी स्वागत करण्यात आले.

प्रारंभी श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या कै. माधवराव पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास बसवराज पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगर शिक्षण विकास मंडळ व श्रमजीवी परिवाराच्या वतीने संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, डॉ. श्रीराम पेठकर, डॉ. सतिश शेळके, डॉ. चंद्रकांत बिराजदार, तात्यासाहेब शिंदे, सुधाकर वडगावे, राजेंद्र गुरव, डॉ. महेश मोटे, डॉ. सुभाष हुलपल्ले, डॉ. रवि आळंगे, उपप्राचार्य योगेश पाटील, अशोक कलशेट्टी, राजू ढगे आदींनी त्यांचा भव्यपुष्पहार, फेटा, शाल घालून जंगी सत्कार केला. यावेळी फटाक्याच्या आतिषबाजीने वातावरण रंगीबेरंगी झाले होते. मुरूम येथील शिवाजी चौकात पाटील यांचे आगमन होताच जेसीबीद्वारे फुलाचा वर्षाव करून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी हजारो कार्यकर्ते संगीताच्या तालावर ठेका धरून व घोषणाबाजीद्वारे रंगीबेरंगी फटाक्याच्या आतिषबाजीने वातावरण ढवळून निघाले होते. ५० वर्षांपेक्षा अधिक धाराशिव जिल्ह्यासह मराठवाड्यात ज्यांनी काँग्रेसची विचारधारा जीवंत ठेवली. आज हाती कमळ घेतल्याने जिल्ह्यातील उमरगा–लोहारा तालुक्यात भाजपप्रणित उत्साहाचे वातावरण नागरिकांमध्ये दिसून येत होते. भाजप प्रवेशामुळे नागरिकामध्ये नवचैतन्य व उत्साह वाढला आहे. पाटील यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देणार असल्याची चर्चा गेल्या ४–५ महिन्यांपासून चालू होती. मात्र पाटील यांनी या चर्चेबाबत कोणतीही प्रतिक्रिया दिली नव्हती. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम मात्र कायम होता. अखेर दि.२७ फेब्रुवारी रोजी मुंबईतील भाजप कार्यालयात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री भगवंत खुब्बा यांच्या उपस्थितीत पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील व युवानेते शरण पाटील उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे नागरिकांच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला. काँग्रेसमध्ये गेल्या चाळीस वर्षात एकनिष्ठ राहून त्यांनी जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. आता मात्र भाजपच्या मार्गावर ते निघाल्याने आपले समाजकार्य सदैव जीवंत ठेऊन धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांच्या न्याय हक्कासाठी त्यांचा लढा कायम चालू राहील, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होताना दिसून येत आहे. जिल्ह्याच्या राजकारणात सर्वात मोठी कार्यकर्त्यांची फळी जर कोणाकडे असेल तर ती म्हणजे पाटील परिवाराकडे असल्याची चर्चा कायम होते. पाटील यांचा राजकारणातील प्रदीर्घ अनुभव, मनमिळाऊ स्वभाव, संयम, शिस्त, बेरजेचे राजकारण यामुळे अजात शत्रू असणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. पाटील यांच्यावर अनेकांवेळा टीका–टिप्पणी झाल्या. मात्र त्यांनी केंव्हाही त्या टीका–टिपण्णीना प्रतित्तर दिले नाही. उलट शांत राहून आपल्या



चाणक्य नीतीने आपला राजकीय प्रवास चालु ठेवला. त्यामुळेच ते राजकीय क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण करू शकले. कोणत्यावेळी कोणता निर्णय घेणे योग्य राहील याचा पूर्णपणे अभ्यास करून आणि आपल्या राजकारणाच्या अनुभवाचा तर्क वापरून पुढील दिशा ते ठरवीत असतात. बसवराज पाटील यांनी काँग्रेसची साथ सोडली मात्र काँग्रेसची विचारधारा ते केंव्हाही सोडणार नाहीत उलट त्या विचारधारांचा भाजप मार्गावर नक्की पेरणी करतील, अशी आशाही नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. एक मात्र नक्की पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे धाराशिव जिल्ह्यातील काँग्रेस मात्र एकाकी पडली असून भाजपाला पाटील यांच्या माध्यमातून मोठे बळ प्राप्त झाले आहे. या बळाचा भाजप कोणत्या प्रकारे उपयोग करून घेईन हे येणारे काळच ठरवेल.

# संपादकीय

## लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपासाठी चर्चेचे गुऱ्हाळ

१७व्या लोकसभेचा कार्यकाळ लवकरच समाप्त होत असल्याने देशाच्या १८व्या लोकसभेसाठी लवकरच केंद्रीय निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होईल आणि त्याचक्षणी देशामध्ये आचारसंहिता लागू होईल. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांना अजून दीड ते दोन महिन्यांचा कालावधी बाकी असला, तरी निवडणुकांचे पडघम साधारणत: सात-आठ महिन्यांपासूनच देशामध्ये वाजण्यास सुरुवात झालेली आहे.भाजपा देशामध्ये २०१४ पासून सत्तेवर आहे. २०१९ लाही देशाची सत्ता भाजपानेच संपादन केली होती आणि २०२४ ला होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीतही भाजपाच सत्ता संपादन करण्याची दाट शक्यता आताच दिसत आहे. भाजपाचा अश्व सत्ता संपादनाच्या दिशेने वाटचाल करीत असताना त्या अश्वाला अडविण्याची क्षमता सध्या तरी कोणत्याही पक्षामध्ये अथवा आघाडीमध्ये पाहावयास मिळत नाही. भाजपाला सत्तेपासून अडविण्यासाठी काँग्रेस पक्षाने अन्य विरोधी पक्षाची एकजूट करत भाजपाविरोधात निवडणूक लढाई लढण्यासाठी इंडिया आघाडीची स्थापना केली आहे. तथापि निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वीच या इंडिया आघाडीला फुटीचे ग्रहण लागलेले आहे.

इंडिया आघाडीतील मातब्बर समजले जाणारे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी इंडिया आघाडीला रामराम ठोकत भाजपाशी मैत्री स्वीकारली आहे. इंडिया आघाडीचा चेहरा म्हणून गणल्या जाणाऱ्या काँग्रेसला २०१४ पासून लागलेली राजकीय घरघर अजूनही थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. ज्या मातब्बरांनी काँग्रेस पक्षामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती, त्यांच्या घरातील पुढील पिढी मात्र काँग्रेस पक्षाचा त्याग करत भाजपामध्ये जात आहे. एकेकाळ माधवराव सिंधिया हे काँग्रेसमधील मातब्बर प्रस्थ म्हणून ओळखले जायचे. काही वर्षांपूर्वी त्यांचे पुत्र ज्योतिरादित्य सिंधिया यांनी काँग्रेसला रामराम ठोकला व भाजपात प्रवेश केला.मुंबई काँग्रेस म्हणजेच मुरली देवरा हे अनेक वर्षांचे गणित होते. त्यांचे पुत्र मिलिंद देवरा यांनी काँग्रेसचा त्याग करत मुख्यमंत्री शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला आहे. शंकरराव चव्हाण हे काँग्रेसमधील अजून एक मातब्बर प्रस्थ आणि गांधी घराण्याचे कडवट व विश्वासू शिलेदार. त्यांचे पुत्र अशोक चव्हाण यांनी राज्यसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसचा त्याग करत भाजपात प्रवेश केला. देशाच्या विविध राज्यांमध्ये काँग्रेसचे अनेक मातब्बर हे पक्षाचा त्याग करत भाजपामध्ये प्रवेश करत आहेत. इंडिया आघाडीचा काँग्रेस हा मुख्य चेहरा असतानाही त्याच पक्षामध्ये ठिकठिकाणी गळती लागत आहे. त्या पक्षाच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडी भाजपाचा कसा सामना करणार?, असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे. त्यात ज्या काँग्रेसने इंडिया आघाडी स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला, खटाटोप केला, त्याच काँग्रेसला आघाडीमध्ये कोणी फारसे जुमानत नसल्याचे अलीकडच्या घडामोडींदरम्यान स्पष्ट झाले आहे.आम आदमी पार्टी, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी या तीन पक्षांनी तर आपला प्रभाव असणाऱ्या राज्यांमध्ये काँग्रेसला न जुमानता एकला चलो रे'ची भूमिकाही जाहीर करत स्वत:च जागावाटप जाहीर केले होते. आपला पंजाब व दिल्लीमध्ये काँग्रेसशी युती करण्यात स्वारस्य नाही. तृणमूल काँग्रेसदेखील पश्चिम बंगालला सामावून घेण्यास रुची दाखवत नाही. समाजवादी पार्टीने उत्तर प्रदेशात काँग्रेसचा प्रभाव नसल्याचे सांगत जागा देण्यास आडकाठी केली होती. त्यावरून राजकीय वर्तुळात खळबळ निर्माण झाली. अखेरीस आपने पंजाब व दिल्लीमध्ये, तर समाजवादी पार्टीने उत्तर प्रदेशात काँग्रेसला जागावाटपात स्थान देण्याची तयारी दाखविली आहे.

जी काँग्रेस सत्तासंपादनासाठी आक्रमक होण्याची भाषा बोलत आहे, त्या पक्षाच्या सोनिया गांधी यांनी प्रकृतीच्या कारणास्तव लोकसभा लढविण्यास नकार देत राज्यसभा निवडणुकीच्या माध्यमातून मागच्या दाराने संसदेत प्रवेश केला आहे. राहुल गांधीदेखील उत्तर प्रदेशऐवजी दुसऱ्या राज्यातील सुरक्षित मतदारसंघाचा शोध घेत आहेत. मतदारसंघ न मिळाल्यास पुन्हा ते केरळच्या वायनाडू मतदारसंघाला पसंती देण्याची शक्यता आहे. अमेठी व रायबरेली या पारंपरिक मतदारसंघातून गांधी परिवार काढता पाय घेत असल्याचे चित्र आता तरी सुरुवातीच्या टप्प्यात निर्माण झालेले आहे.

रायबरेलीतून प्रियंका गांधी निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. प्रियंका गांधी या गेल्या काही वर्षांपासून पक्षांतर्गत राजकारणात सक्रिय असल्या तरी पक्षामध्ये आणि जनसामान्यांमध्ये प्रभाव निर्माण करण्यास त्यांच्या नेतृत्वाला मर्यादा पडल्या आहेत. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेला तुरळक भागांचा अपवाद वगळता इतरत्र फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. उत्तर प्रदेशसारख्या ८० जागा असलेल्या राज्यात ७० हून अधिक जागांवर विजय मिळविण्याचा दावा भाजपाकडून केला जात आहे. मोदी-योगी करिष्म्यामुळे ते शक्यही आहे. भाजपाच्या सत्तेचा पायाच तेथेच रचला जाणार आहे. अयोध्या मंदिरामुळे भाजपाचा करिष्मा वाढीस लागला आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देशाच्या कानाकोपऱ्यांत होत असलेली विकासकामांची मांदियाळी पाहता इंडिया आघाडीला भाजपाविरोधात प्रचार करण्यासाठी फारसे मुद्दे नसल्याची शोकांतिका आहे. केवळ मोदी विरोध करून देशाची सत्ता संपादन करणे त्यांना शक्य होणार नाही. त्यात इंडिया आघाडीमध्ये सुसंवाद नाही आणि अनेक भागांत अविश्वासाचे वातावरण आहे. आज आघाडीमध्ये सामील असणारा पक्ष उद्या भाजपाशी हातमिळवणी करणार नाही, याची कोणी खात्री देऊ शकणार नाही. लोकसभा निवडणुकीतील जागावाटपावरून आघाडीतील घटक पक्षांमध्ये आताच वादाचे फटाके फुटू लागले आहेत. त्या तुलनेत भाजपा व मित्र पक्षांमध्ये जागावाटपावरून कोठेही वाद निर्माण होत असल्याचे दिसून येत नाही.महाराष्ट्राचा विचार करावयाचा झाल्यास ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी किमान ४५ जागांवर विजय मिळविण्याच्या ध्येयाने भाजपा गेल्या अनेक महिन्यांपासून संघटनात्मक पातळीवर कार्यरत आहे. भाजपाच्या जोडीला शिंदेंची शिवसेना व अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस असल्याने विरोधकांची ताकद दुभंगली गेली आहे. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीमुळे मविआची ताकद कमी झाली आहे. त्यात प्रकाश आंबेडकरांनी २५हून अधिक जागांची मागणी करत मविआला अडचणीत आणले आहे. जागावाटपावरून संघर्ष करणारी इंडिया आघाडी आणि विकासकामांच्या पाठबळावर जनसामान्यांपुढे मतदानासाठी जाऊ पाहणारी भाजपा पाहिल्यावर २०२४ची लढाई एकतर्फीच होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## अंतराळवीर सुनीता विल्यम ३८



जिने आपल्या कुटुंबीयांच्या साथीने असामान्य यश प्राप्त केले त्या अंतराळवीरांगना सुनीता विल्यम हिचा जन्म १९ सप्टेंबर १९६५ रोजी अमेरिकेतील ओहायोमधील क्लिव्हलँड इथे झाला. तिचे वडील डॉ. दीपक एन. पंड्या हे भारतातील गुजरातमधले असून सध्या संशोधक, शरीरशास्त्राचे प्राध्यापक आणि संशोधनपर पुस्तकांचे लेखक आहेत. आई स्लोव्होनियन असून तिचे नाव बोनी त्सालोकर पंड्या असे आहे. तर सुनीताच्या पतीचे नाव मायकेल जे. विल्यम आहे.

लहानपणी सुनीता पट्टीची पोहणारी होती. पोहणं, हॉर्सबॅक रायडिंग, पियानो वाजवणं, पदार्थ बनवणं या तिच्या आवडीच्या गोष्टी होत्या. युनायटेड स्टेट्स नेव्हल अॅकॅडमीतून १९८७ मध्ये तिने बी.एस्सी. फिजिकल सायन्समधील पदवी मिळवली. १९८९ साली फ्लोरिडामध्ये तिची नेव्हल एव्हिएटर म्हणून नेमणूक झाली. तर १९९३ मध्ये युनायटेड स्टेट्स नेव्हल टेस्ट पायलट ही पदवी तिने प्राप्त केली. पदव्युत्तर शिक्षणानंतर १९९८ साली 'नासा' मध्ये अंतराळयात्री म्हणून तिची निवड झाली. तेव्हा पूर्वीचा ३० विमानांतील २३०० फ्लाईट अवर्सचा उड्डाणाचा अनुभव तिला उपयोगी पडला. पृथ्वीपासून सुमारे २५० मैल दूर असलेल्या अंतराळात आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाचे (इंटरनॅशनल स्पेस स्टेशन, आय.एस.एस. चे) बांधकाम सुरू आहे. त्यासाठी मदत करणे, वेगवेगळे प्रयोग अंतराळवीरांकडून करून घेणे अपेक्षित असते. अंतराळातील मॅरेथानविषयी, शून्यावस्थेच्या परिणामांविषयी शिवाय तेथील ट्रेडमील, व्यायाम, वजनविरहित अवस्थेत हाडे व स्नायू कमजोर पडू नयेत म्हणून काय उपाय करता येतील, याविषयी सुनीताबाबतीतले बरेच प्रयोग यशस्वी ठरले. आय.एस.एस. साठी निवड झालेल्या अंतराळवीरांवर खूप मोठी जबाबदारी असते. परिस्थितीला सामोरे जायला, त्यावर नियंत्रण मिळवायला, एखादी गोष्ट घडवून आणायला किंवा नादुरुस्त भाग दुरुस्त करून नव्याने जोडायला, तातडीची परिस्थिती हाताळायला, अंतराळातली उपजीविका, रोजच्या घटनांच्या नोंदी इत्यादी बऱ्याच गोष्टींसाठी लागणारे कठोर प्रशिक्षण अथक प्रयत्नांनी सुनीताने पार पाडले हाते. १९९८ मध्ये त्यामुळेच तिची नासामध्ये निवड झाली ती अंतराळयात्री म्हणूनच ! ११ डिसेंबर २००६ रोजी सुनीता आय.एस.एस. वर पोहोचली. १६ डिसेंबर २००६ रोजी एका सोबत्याबरोबर अंतराळ यानातून बाहेर पडून ७ तास ३१ मिनिटांच्या अथक प्रयत्नांनी या अवकाश स्थानकाच्या विद्युत प्रणालीची दुरुस्ती केली.

अंतराळात मग सुनीताने अनेक विक्रम प्रस्थापित केले. तिने २९ तास १७ मिनिटांचा स्पेसवॉक सर्वाधिक करून विक्रम तर केलाच पण तिने ट्रेडमिलवर पळत ४ तास २४ मिनिटांत मॅरेथॉन पूर्ण करीत १,२१,६०० कि.मी. चा प्रवास केला. शिवाय ती अंतराळात सर्वाधिक काळ (१९४ दिवस, १८ तास सुमारे) वास्तव्य करणारी मानव ठरली व २२ जून २००७ रोजी पृथ्वीवर सुखरूप पोहोचली. त्यामुळेच तिच्या विक्रमांच्या पराक्रमाचा सार्थ अभिमान आपणा सर्व भारतीयांच्या मनात दाटून राहिला आहे!

## (गुरु वचन) त्यागाने योग प्राप्ती

संसारामध्ये कोणताही व्यापारी व्यापारासाठी जेवढी गुंतवणूक करतो. तेवढ्याच अधिक फायद्याचा भागीदार तो बनतो. अशाप्रकारे लक्ष, कोटी, अब्ज असा जेवढा अधिक खर्च केला जातो. तेवढाच त्याचा अधिक लाभ मिळतो. शेतकरी शेतामध्ये काही धान्य पेरतो तेव्हाच त्यापासून अधिक धान्य मिळते. यज्ञकार यज्ञामध्ये आहुती देतो, तेव्हाच त्याला लोक-परलोकामध्ये विविध ऐश्वर्य आणि सुख प्राप्त होते. अशाप्रकारे भोगत्यागनेच उत्तम भोगाची प्राप्ती होऊ शकते. मानवास वाटते की, वसन, अलंकार, उत्तम भोजन, उत्तम वनिता, पूत्र तसेच सर्वाधिक ऐश्वर्य असावे, परंतु असे वाटण्याने हे सर्व होणे अशक्य आहे. हे सत्य आहे की, लाख प्रयत्न केल्यानंतर सुद्धा मनुष्याला शरीरात घालायला कपडे आणि पोट भरण्यास अन्न मिळत नाही. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय प्रावक्त धर्माधर्मही अतिरिक्त वस्तुंच्या प्राप्तीसाठी कारण ठरतात. अन्यायानंतर प्राप्त झालेल्या धनासोबतही त्याला वैर वाटते.किंवा त्याचा विनाश होऊन जातो. किंवा योग करणाऱ्याची भोगशक्ती खत्म होऊन जाते. शेवटी त्याग आणि ग्रहण दोन्हीही शास्त्रानुसार अनुकूल वैराग्य आणि त्याग असल्याने सवर्गलोक, इंद्रलोक, वृहलोक प्राप्त होते. येथील भोगाप्रमाणे इतरत्र योग प्राप्त होने असंभव आहे. जो रस, जो शब्द, जो सुगंध तेथे आहे जी उर्वशी, राची, रंभा आदी लोकांमध्ये प्राप्त होते, ते येथे कोठे. श्वान, शकर, शृंगाल आदी योग विषयांत स्पृहाचाही काय अर्थ असू शकतो? बुद्धीमान लोक तर त्या सुखामध्ये अनित्यता आणि विनश्वरताचा अनुभव घेऊन वेगळे होतात.

## शरीराच्या या आजारांमध्ये फायदेशीर आहे डाळिंब, ७ दिवस खा सलग दिसेल फायदा



मुंबई: डाळिंब हे असे फळ आहे ज्यात फायबर, व्हिटामिन आणि आयर्न मोठ्या प्रमाणात असते. हे एक असे फळ आहे जे वर्षभर खायला मिळते. मात्र अनेकजण हे खात नाही. डाळिंब खाल्ल्याने आपण अनेक आजारांपासून दूर राहू शकतो. डाळिंबामध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असता. पोटाच्या पचनासाठी हे अतिशय फायदेशीर आहे. जर तुम्ही दररोज ७ दिवस डाळिंब खाल तर शरीरास खूप फायदा होईल.

जर तुम्हाला हाय बीपीचा त्रास आहे जर डाळिंब जरूर खाल्ले पाहिजे. डाळिंबामध्ये झींपळलळल रलळव भरपूर प्रमाणात असते. यामुळे कोलेस्ट्रॉल कमी होते. याशिवाय ट्रायग्लिसराईडही कमी करण्याचे कामही डाळिंब करते. रक्ताच्या नसा साफ करत हाय बीपी कंट्रोलमध्ये राहतो.जे डाळिंब खातात अथवा ज्यूस पितात त्यांचा तणाव कंट्रोलमध्ये राहतो. यातील ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करतात. सोबतच सायकोलॉजिकल स्ट्रेसही कमी करतात. यामुळे झोपही चांगली येते.

डाळिंब खाल्ल्याने स्टॅमिना वाढतो. यात फ्लेवॉनॉल्स भरपूर असतात यामुळे शरीराची सूज कमी होते. तसेच हाडांशी संबंधित समस्याही कमी होतात.

ज्यांना सतत सुस्ती आणि थकवा जाणवत असतो त्यांच्यासाठी डाळिंब खाणे अतिशय फायदेशीर आहे. डाळिंबामध्ये आढळणारे रेड ब्लड सेल्स वाढवण्यासोबतच शरीराचा थकवा आणि सुस्तीही दूर करतात.

## इतिहासात आजचा दिवस

**अंतरराष्ट्रीय**

- ८६ – युजेनियस चौथा पोपपदी.
- १८४५ – फ्लोरिडा अमेरिकेचा २७वे राज्य झाले.
- १८४९ – मिनेसोटाला अमेरिकेचा प्रांत म्हणून मान्यता.
- १८५७ – फ्रांस व युनायटेड किंग्डमने चीन विरुद्ध युद्ध पुकारले.
- १८६३ – आयडाहोला अमेरिकेचा प्रांत म्हणून मान्यता.
- १८७८ – बल्गेरियाला ओट्टोमान साम्राज्यापासून स्वातंत्र्य.
- १९०४ – जर्मनीचा कैसर विल्हेम दुसऱ्याचा आवाज प्रथम मुद्रित केला गेला.
- १९१८ – पहिले महायुद्ध – ब्रेस्ट-लिटोव्स्कचा तह – युद्धातील रशियाचा सहभाग समाप्त. फिनलंड, लात्व्हिया, एस्टोनिया, पोलंड व लिथुएनियाच्या स्वतंत्र अस्तित्त्वाला मान्यता.
- १९३१ – अमेरिकेने स्टार स्पँगल्ड बॅनर या गीतास राष्ट्रगीताचा दर्जा दिला.
- १९३८ – सौदी अरेबियात खनिज तेल सापडले.
- १९३९ – गांधीजींनी मुंबईत आमरण उपोषण सुरू केले.
- १९४२ – दुसरे महायुद्ध – जपानी वायुदलाने पश्चिम ऑस्ट्रेलियातील ब्रूम गावावर बॉम्बफेक केली. १०० ठार.
- १९४३ – दुसरे महायुद्ध – लंडनमध्ये बॉम्बविरोधी आश्रयस्थानात घुसताना झालेल्या चेंगराचेंगरीत १७३ ठार.
- १९४५ – दुसरे महायुद्ध – आत्तापर्यंत तटस्थ असलेल्या फिनलंडने जर्मनी, जपान व मित्रदेशांविरुद्ध युद्ध पुकारले
- १९५३ – कॅनेडियन पॅसिफिक एरलाईन्सचे विमान पाकिस्तानच्या कराची शहराजवळ कोसळले. ११ ठार.
- १९५८ – नुरी अस सैद १४व्यांदा ईराकच्या पंतप्रधानपदी.
- १९६१ – हसन दुसरा मोरोक्कोच्या राजेपदी.
- १९६६ – ब्रिटिश ओव्हरसीझ एरवेझचे बोईंग ७०७ जातीचे विमान जपानच्या माउंट फुजीवर कोसळले. १२४ ठार.
- १९७४ – तुर्कस्तानचे डी.सी.१० जातीचे विमान पॅरिसजवळ कोसळले. ३४६ ठार.
- १९९१ – लॉस एन्जेल्सच्या पोलिसांचे रॉडनी किंग नावाच्या टॅक्सीचालकाला चोप देतानाचे चित्रीकरण केले गेले.
- १९९५ – सोमालियातून संयुक्त राष्ट्रांचे शांतिदल बाहेर पडले.
- २००१ – अमेरिकन वायु दलाचे सी.२३ जातीचे विमान जॉर्जियात कोसळले. २१ ठार.
- २००८ – दमित्री मेदवेदेव रशियाचे नवे राष्ट्राध्यक्ष बनले.
- २००८ – अलकायदाचा प्रमुख विचारक आणि रणनीतिकार अयमान अल जवाहरीने २१२ पानांच्या एका पुस्तकाचे प्रकाशन केले.

**राष्ट्रीय**

- १९७३ – भारताच्या ओरिसा राज्यात राष्ट्रपती राजवट.
- २००८ – आंध्र प्रदेशात सरकारी जमिनीच्या लिलावाच्या मुद्यावरुन विधानसभा अध्यक्षांनी मुख्य विरोधी पक्ष तेलगू देसम पार्टी (टीडीपी)च्या २६ आमदारांना एक दिवसासाठी निलंबित केले.
- २००८ – भारताचा टेनिसपटू महेश भूपती व त्याचा जोडीदार बहामासचा मार्क नोएल्सच्या अग्रमानांकीत जोडीने थायलँडचे जुळे भाऊ संचई व सोंचट रतिवतानाचा पराभव करत आरएमके चॅम्पियनशीप विजेतेपद पटकावले.

**जन्म**

- १४५५ – जॉन दुसरा, पोर्तुगालचा राजा यांचा जन्म.
- १८३९ – जमशेटजी टाटा, भारतीय उद्योगपती यांचा जन्म.
- १८४७ – अलेक्झांडर ग्रॅहाम बेल, स्कॉटिश संशोधक यांचा जन्म.
- १९३० – इयोन इलेस्कु, रोमेनियाचा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

**निधन**

- ५६१ – पोप पेलाजियस पहिला यांचे निधन.
- १७०७ – औरंगझेब, मुघल सम्राट यांचे निधन.
- १९३७ – आमेलिया इअरहार्ट, अमेरिकन वैमानिक (बेपत्ता) यांचे निधन.
- १९४३ – जॉर्ज थॉम्पसन, इंग्लिश क्रिकेटपटू याचे निधन.
- २००८ – जेफ हिली, कॅनडायी रॉक स्टार याचे निधन.

## राशी भविष्य



आडवे शब्द

१. बिनविषारी महासर्प
३. कायमचे स्थान
६. कुंतीचे दोन पराक्रमी पुत्र
१०. किंमत
११. दार
१३. संगीतातील एक राग
१४. आमने सामने
१७. वजन
१८. लाकडाची एक उत्कृष्ट जात
१९. हिंदीत खत
२०. बहुमोल
२२. हाट
२३. कमळ
२५. रममाण
२७. कोवळी फांदी
२८. मोठा हातोडा
२९. लक्ष्मीचे एक नाव
३१. मागणी, विनंती
३२. प्रतिष्ठेचा अवयव
३४. अव्यवस्थितपणा
३६. जेमतेम
३८. मन, विचार
४०. शिखराचे टोक
४१. ओले खोबरे
४२. शेतातील आयुध
४४. पाणी
४५. दणकट
४७. डाळीचे कालवण
४८. वस्ती
५०. आदरातिथ्य
५२. बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दौर
५४. एक गड्डा भाजी
५७. रूक्ष
५८. युद्ध
५९. गायीचे पिल्लू
६१. कर्ण
६२. वर्दळ, गर्दी
६३. बूड
६४. किंमतीतील वृद्धी
६६. पुष्परस
६७. मगज, फळातील खाद्यभाग
६९. गुप्त हस्तक
७०. सापाची एक जात
७२. बाजेची कापडी पट्टी
७५. कापडाचा एक जाडाभरडा प्रकार
७६. मत देणे
७७. मलई
७८. रविवासर
७९. साह्य

उभे शब्द

१. अमावस्या
२. फुलांची माळ
३. मृत्यु नसलेला
४. दुसऱ्यासाठी खर्च करणे
५. मूल्य
६. गबाळा
७. नजरफेक
८. महाभारतातील शक्तीशाली गदाधर
९. इच्छा दडपून टाकणे (वाक्प्रचार)
१०. श्रीकृष्णाचे एक नाव
१२. तुळई
१५. आकर्षक
१६. श्रीकृष्णाचे द्रौपदीशी नाते
१७. अवधान, लक्ष
२१. छोटासा
२३. राष्ट्रगीतातील पहिले राज्य
२४. धाक, भीती
२६. सिद्धता
२८. ढग, दाट
३०. घरातील मधली खोली
३२. मत्स्य, मीन
३३. गप्प बसणे
३५. पशू, श्वापद
३६. कौशल्य
३९. टोळीचा प्रमुख
४०. भांडण
४२. आगमन, प्रकट होणे
४६. माहितगार
४८. मिरवत नेणे
४९. सर्वस्व
५१. एक पालेभाजी
५३. मैत्रिण
५५. नवरदेव
५६. प्रचंड, आरडाओरड
५९. परिणामकारक (हिंदी)
६०. अस्थिर
६४. हिंदुस्थान
६५. बटु अवतार
६८. ठराविक पैसे
६९. सुवर्ण
७१. पृथ्वी
७३. घाव, प्रहार
७४. सूर्याचे एक नाव
७५. शंकर

आडवे उत्तर

१.अजगर ३.अढळपद ६.अर्जुन भीम १०.दाम ११.दरवाजा १३.यमन १४.सम ोरासमोर १७.भार १८.सागवान १९.खाद २०.अनमोल २२.बाजार २३.पंकज २५.रत २७.डहाळी २८.घण २९.रमा ३१.याचना ३२.मान ३४.बजबजपुरी ३६.कसाबसा ३८.मानस ४०.कळस ४१.चव ४२.अवजार ४४.जल ४५.बळकट ४७.वरण ४८.वसाहत ५०.पाहुणचार ५२.कासरा ५४.नवलकोल ५७.रखरखीत ५८.समर ५९.कालवड ६१.कान ६२.रहदारी ६३.तळ ६४.भाववाढ ६६.मध ६७.गर ६९.हेर ७०.मणेर ७२.नवार ७५.हरक ७६.मतदान ७७.साय ७८.रविवार ७९.मदत

उभे उत्तर

१.अवस २.गजरा ३.अमर ४.पदरमोड ५.दर ६.अजागळ ७.नयनबाण ८.भीम ९.मन मारणे १०.दामोदर १२.वासा १५.मोहक १६.सम १७.भान २१.लहानसा २३.पंजाब २४.जरब २६.तयारी २८.घन ३०.माजघर ३२.मासा ३३.मौन ३५.जनावर ३६.कसब ३७.बदक ३८.मावळण ३९.सरदार ४०.कलह ४२.अवतरणे ४३.जाणकार ४४.जसा ४६.टपाल ४८.वरात काढणे ४९.तनम नधन ५१.चाकवत ५३.सखी ५५.वर ५६.कोलाहल ५९.कारीगर ६०.डळमळीत ६४.भारत ६५.वामन ६८.रकम ६९.हेम ७१.रसा ७३.वार ७४.रवि ७५.हर

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# विविध क्षेत्रात उच्चस्थान प्राप्त करण्याचा ध्यास विद्यार्थ्यांनी घ्यावा- धनंजय ढोणे

## ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न




औसा: (प्रतिनिधी) तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरफेस्टिव्हल २०२४ मधील ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुलच्या वार्षिक स्नेहसंमेल्लनात चिमुकल्यांनी विविध सांस्कृतिक नृत्य, ऐतिहासिक कला, नाटक, गीत संगीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

स्नेहसंमेल्लनाचे उद्घाटन धनंजय ढोणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक, लातूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, संचालक जयशंकर हुरदळे, सिध्दलिंग निलंगेकर, विश्वनाथ निलंगेकर, विविध कार्यकारी सवो सहकारी सोसायटी आलमलाचे चेअरमन विश्वनाथ बिराजदार,ड महीशंकर धाराशिवे, कैलास निलंगेकर, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, योगेश धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यू बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्या स्वाती कापसे, गणेश माडजे व अमरसिंग हजारे इत्यादी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी शाळेमध्ये राबविल्या जाणाऐया विविध उपक्रमांची व स्पर्धा परीक्षेची माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शाळेमध्ये राबविल्या जाणाऐया पालकत्व उपक्रमाची मोठी भूमिका असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे उद्घाटक धनजय ढोणे यांनी शिक्षणा बरोबर खेळाचे महत्व असुन कोणतेही क्षेत्र निवडताना त्या क्षेत्रातील उच्च स्थान प्राप्त करण्याचा ध्यास घेऊन प्रयत्न केले पाहिजे कारण आपल्या यशातूनच राज्याचा व देशाचा विकास होतो असे आपल्या मार्गदर्शनातून विध्यार्थ्यांना सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता सांस्कृतिक विभाग प्रमुख परमेश्वर चिलखे, गीता चव्हाण, यास्मीन फाजल,हलिमा अरब, विनोद पांडुळे, मंजूरपाशा शेख, सौरभ वडे, पल्लवी लद्दे, सोहेल शेख, सुप्रिया जाधव, दिपा पोतदार, रश्मी दुधनकर, प्राजक्ता कदम, पायल घायल, नाजमीन सय्यद, हबीब सय्यद, अरबाज पठाण, सचिन ससाने, शरद सांळुके, दिपक खोजे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले. सदरील कार्यक्रमास मोठया संख्येने ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तानाजी जाधव व फिरदोस सय्यद यांनी केले तर आभार परमेश्वर चिलखे यांनी मानले.

# महात्मा बसवेश्वरच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष युवक शिबिरात मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न



लातूर / प्रतिनिधी- महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, लायन्स क्लब, लातूर व लायन्स उदयगिरी नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास विशेष युवक शिबिराच्या अंतर्गत मोफत नेतृत्व तपासणी व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर मौजे जवळा बु. येथे संपन्न झाले.

या शिबिरामध्ये एकूण ४९ नेत्र रुग्णावर चिकित्सा करून डोळ्याची नियमित घ्यावयाची काळजी यासंदर्भात माहिती देण्यात आली. या शिबिरात डॉ. तेजस, डॉ. राहुल अलमकेरे, डॉ. मनोज कापरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले.

यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, सरपंच चनबस भुजबळ, उपसरपंच मनोज कापरे आदीची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. इंगळे राखी हिने केले तर आभार डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले. या शिबिराच्या यशस्वीतेकरिता ग्रामस्थ आणि शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# गरिबाच्या फ्रीजला वाढती मागणी

## माठ, शीतपेये, कलिंगडाकडे नागरिकांचा ओढा

शिरूरआनंतपाळ : मार्च महिण्याच्या पहिल्या आठवड्यापासुन कडक ऊन्हाळा जाणवु लागला आहे. तापमानाचा पारा दिवसे दिवसे वाढत आहे. शिरूरआनंतपाळ शहराचा पारा ३५ अंशाचा पुढे जात आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक बाजारात विक्रीसाठी आलेल्या गरिबाचा फ्रीज म्हणुन ओळखल्या जाणार्या मातीच्या माठाची खरेदी करत असल्याचे दिसुन येत आहे.

ऊन्हाच्या तीव्रतेपासुन बचाव करण्यासाठी रसवंती ग्रह व थंडपेयाच्या गाड्यावर गर्दी करत असल्याचे चित्र दिसुन येत आहे. बाजारात लावलेल्या ठिकठिकाणी थंडपेयाच्या गाड्यावर नागरिकांची पावले वळत आहेत. ऊन्हामुळे अंगाची लाही लाही होत असुन शहाळे,उसाचा रस, लिंबु शरबत, ज्युस, आईस्क्रिम, लस्सी विक्रेत्याकडे गर्दी वाढत आहे. ऊन्हामुळे शरिराचे तापमान थंड ठेवण्यासाठी मातीच्या माठाला मागणी वाढली आहे. मातीचा माठ दिडशे रुपया पासुन तीनशे रुपया पर्यंत विक्रीसाठी उपलब्ध होत आहेत. तसेच प्रवासात वापरण्यासाठी काटनच्या पिशव्या वि विविध रंगीबेरंगी बॉटल विक्रीसाठी आल्याचे विक्रेते संतोष गलबले यांनी सांगितले. वाढत्या उष्म्यात गारवा देणारे थंडगार पाणी राहण्यासाठी मातीच्या माठाशिवाय पर्याय नाही. त्यामूळे गरिबाच्या फ्रीजला श्रीमंत लोकाचीही मागणी वाढली आहे.



# कुलगुरूंच्या हस्ते उत्कृष्ट जिल्हास्तरीय प्राचार्य पुरस्कार डॉ. रामेश्वर पवार यांना प्रदान

पूर्णा - प्रतिनिधी - येथील स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्र्वर पवार यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्याकरियर कट्टा उपक्रमांतर्गत उत्कृष्ट जिल्हास्तरीय प्राचार्य पुरस्कार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते आज दिनांक २८फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या सभागृहात प्रदान करण्यात आला. याप्रसंगी विचारमंचावर सहसंचालक उच्च शिक्षण विभाग,नांदेड विभागाचे सहसंचालक डॉ किरण बोंदर व अन्य मान्यवर उपस्थित होते.



महाविद्यालयात प्राचार्य डॉ रामेश्र्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर कट्टा अंतर्गत उद्योजकता समन्वयक प्रा डॉ संजय कसाब यांनी परभणी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती मिळावी यासाठी महाविद्यालयातर्फे जिल्हा उद्योग केंद्रास भेट देण्यात आली होती.तसेच करिअर कट्टाचे परभणी जिल्हा समन्वयक तथा महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समन्वयक प्रा डॉ विजय भोपाळे यांनी महाविद्यालयात आर्थिक साक्षरता व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

महाविद्यालयात प्राचार्य डॉ रामेश्वर पवार यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे अनेक उपक्रम राबविले आहेत.त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ रामेश्र्वर पवार यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ९ व्या राष्ट्रीय स्तरावरील पोस्टर सादरीकरण स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी द्वितीय



लातूर दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व आसोसिएशन ऑफ फार्मासुटिकल्स टीचर्स ऑफ इंडिया तसेच शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी आणि दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज, आलमला ता. औसा यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित ९ व्या राष्ट्रीय स्तरावरील पोस्टर सादरीकरण स्पर्धेत दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी चे प्रा. कुलदीप पवार व प्रा. सुषमा पांचाळ यांनी द्वितीय पारितोषिक मिळविले त्यांनी डेव्हलपमेंट आणि ऑप्टिमायझेशन ऑफ बक्कल म्युकोऑडेसिव्ह टॅब्लेट्स फॉर ईन्हान्स बायोऑव्हेबिलीटी ऑफ प्रावास्टटीन आणि फ्लुवास्टटीन या विषयावर पोस्टर सादर केले होते. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यशस्वी प्राध्यापकांचे आणि प्राचार्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी व कोषाध्यक्ष संजय बोरा आणि संस्थेच्या सर्व मान्यवर पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे उज्वल पुरस्काराने सन्मानित

नांदेड - शहरातील देगावचाळ येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांना उज्वल पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

यावेळी सहाय्यक आयुक्त शिवानंद निमगिरी, अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांच्यासह भिक्खू संघ, डॉ. सोनाली खंडेलोटे, डॉ. चेतनकुमार खंडेलोटे, डॉ. हेमंत सोनकांबळे, अशोक धुतराज, उपप्राचार्य साहेबराव इंगोले, प्रा. एस. एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, प्रा. विलास वाठोरे, एस. एन. गोडबोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, कार्यालयीन सचिव मारोती कदम, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, प्रशांत गवळे, उज्वल प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश ढवळे नागलगांवकर, आप्पाराव नरवाडे, अनिता नरवाडे, सुरेखा नरवाडे, सागर नरवाडे आदींची उपस्थिती होती.



तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या पौर्णिमोत्सव कार्यक्रमात उज्वल प्रतिष्ठान कंधारच्या वतीने देण्यात येणारे विविध क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांना मानचिन्ह, पदक, मानाचा फेटा, पुष्पहार, सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच आंध्रप्रदेशातील विजयवाडा धम्मसहलीवरुन परतलेल्या आंबेडकरी अनुयायांचा सत्कार सोहळाही संपन्न झाला.

यावेळी नंदूराम लोखंडे विजय प्रभाकरराव हिंगोले, वसंत अंबाजी हाटकर, आनंद लक्ष्मणराव थोरात, माणिकराव हिंगोले, मिलिंद किशनराव थोरात, प्रकाश गंगाराम गोडबोले, किरणकुमार भीमराव कोकरे, प्रकाश रंगनाथ ढगे, भगवानराव मल्हारी कोल्हे, दीपक पाईकराव शोभाबाई लोखंडे लक्ष्मीबाई विश्वनाथ नवघडे, लक्ष्मीबाई बाबुराव गोडबोले, पुष्पलता वसंत हाटकर, पदमीनबाई नामदेव गोडबोले, अनिताबाई प्रकाश गोडबोले, रुक्मीनबाई आनंद थोरात जयश्रीबाई किशोर दुधमल, सुरेखाबाई दत्ता शेळके, शोभाबाई रंजनाबाई विजय हिंगोले, सत्वशीला दीपक खिल्लारे, प्रतिभा संघपाल गोडबोले, स्वाती यशोदीप गोडबोले यांच्यासह ६५ जणांचा सहभाग होता.

तसेच बौद्ध उपासिका शोभाबाई भगवानराव नरवाडे, सुशीलाबाई भगवान कोल्हे, रेणुकाबाई लक्ष्मणराव लोखंडे, छायाबाई प्रल्हादराव जोंधळे, संघमित्रा विनोद लोखंडे यशोधरा प्रकाश ढगे, उज्वला शंकराव लोखंडे, सुमेधा शुभम साबणे, शिल्पा सुभाष लोखंडे, ललिताबाई भिमराव लोखंडे, निर्मला भीमराव सातोरे, जयश्रीबाई किशोर दुधमल, मायाबाई गोविंद भावे, जनाबाई शामराव गोधने, भागीरिथाबाई रामा नरवाडे, शेवंताबाई रामा नरवाडे, मीनाक्षीबाई राजेश नरवाडे, नंदाबाई मधुकर नरवाडे, हर्षदा नवल नरवाडे, गयाबाई लक्ष्मण महाबळे, केसराबाई गंगाधर कोकरे, चांगुनाबाई यादव कापुरे, आदित्य चंद्रकांत महाबळे, पार्वती मानोहर थोरात उषाबाई शेषराव रणवीर, शितल सुभाष लोखंडे, हर्षदीप सुभाष लोखंडे, आरो प्रकाश ढगे, आदर्श प्रकाश ढगे, सृष्टी दीपक खिलारे, पानेरी दीपक खिलारे यांचीही उपस्थिती होती.

# ज्ञानाचा समाज उन्नतीसाठी उपयोग व्हावा :डॉ. दिगंबर नेटके

देगलूर-(प्रतिनीधी): २००५ नंतर जागतिकीकरणाला वेग आल्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रातही काळानुसार अमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे. प्राप्त ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करणे अत्यंत आवश्यक असून शिक्षकांनी सेवाभाव ठेवून अध्यापन केल्यास समाजाची उन्नती होईल. माणसाच्या जीवनातील प्रत्येक व्यवहाराला नैतिक अधिष्ठान महत्त्वाचे असल्याने विद्यार्थ्यांने भावी काळात वाटचाल करताना आपली क्षमता व मर्यादा लक्षात घेऊन वाटचाल केली पाहिजे. असे प्रतिपादन डॉ. दिगंबर नेटके यांनी केले. ते देगलूर महाविद्यालय, देगलूरच्या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




समारंभाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार यांची उपस्थिती होती.

देगलूर महाविद्यालयात पदवी - पदव्युत्तर शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी २६ वा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ ०१ मार्च २०२४ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्टाता डॉ. एम. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी डॉ. एम. के. पाटील म्हणाले की, सध्याची शिक्षण व्यवस्था संक्रमण अवस्थेतून जात आहे. नवे शैक्षणिक धोरण येऊ घातल्यामुळे सर्वांना त्यास सामोरे जाण्यासाठी तयारी करणे आवश्यक आहे. गुणवत्ताप्रधान शिक्षणच समाजाला प्रगतीकडे नेऊ शकते. प्राचीन काळात तक्षशिला आणि नालंदा विद्यापीठाने जगाला मार्गदर्शन करण्याचे काम केले आहे.

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे विद्यार्थ्यांनी विविध कौशल्य आत्मसात करावीत. महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवणे अत्यंत आवश्यक असून विद्यार्थ्यांच्या आवडीचे विषय आणि तसा अभ्यासक्रम आखण्याची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी केले. याप्रसंगी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य जनार्धन चिद्रावार, रवींद्र द्याडे, देवेंद्र मोतेवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. संजय पाटील, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. किशन सुनेवार, डॉ. सुदाम लक्ष्मणकुमार, श्री राजू जंगीलवार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मिरवणुकीने झाली. दीपप्रज्वलन आणि स्वामीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यापीठ गीताने समारंभास प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. रत्नाकर लक्षटे यांनी केले तर आभार डॉ. विनय भोगले यांनी मानले. याप्रसंगी एकूण १५० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. समारंभाच्या यशस्वीतेसाठी डॉ. माधव चोले, डॉ. सचिन कोंडेकर, डॉ. भानुदास नरवाडे, डॉ. राजकुमार पोकलवार , डॉ. सुरेश काशिदे, प्रा. गणेश क्यादारे, प्रा. विनोद काळे , अधीक्षक गोविंद जोशी , प्रशांत चौव्हाण, अशोक मामीडवार, प्रकाश सोनकांबळे, किशन पांचाळ व नियोजन समितीतील सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात मतदार जनजागृती रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद




लातूर / प्रतिनिधी- जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर निवडणूक साक्षरता मंडळ, वर्शीप अर्थ फाउंडेशन व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०१ मार्च २०२४ रोजी दयानंद वाणिज्य महाविद्यालयात मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. राजाराम पवार, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, मतदार साक्षरता मंडळ नोडल ऑफिसर प्रा. अक्षय पवार, वर्शीप अर्थ फाउंडेशन जिल्हा समन्वयक श्री. आकाश सोनकांबळे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी श्री. भीमराव दुनगावे, जिल्हा उपसमन्वयक कु. वैष्णवी मोरे, जिल्हा उपसमन्वयक श्री. आजम पठाण, नेहरू युवा केंद्राचे प्रतिनिधी, रा.से.यो सहकार्यक्रमाधिकारी प्रा. योगेश शर्मा, प्रा. अजय चव्हाण, प्रा. लता जाधव, प्रा. दीपक सूर्यवंशी, प्रा. कृष्णाई पाचंगे, निवडणूक साक्षरता मंडळ चेअरमन योगेश झिरमिरे, कॅम्पस ॲम्बेसेडर गजानन मिश्रा, श्री. राजकुमार माने व ELC चे सर्व सदस्य व विविध महाविद्यालयातून आलेले रा.से.यो. स्वयंसेवक मोठ्या संख्येने या रॅलीस उपस्थित होते.

# क्रांती माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**जळकोट (प्रतिनिधी)** जळकोट तालुक्यातील केकत सिंदगी येथील क्रांती माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपक्रमशील मुख्याद्यापक तथा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे सदस्य मा. श्री .विलास सिंदगीकर हे होते . तर प्रमुख पाहुणे म्हणून जळकोट जि.प. प्रशालेचे मुख्याद्यापक मा . श्री .पी .व्ही.टेकले सर मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. क्रांती विद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात दि .२८ फेब्रुवारी .२०२४ रोजी निरोप समारंभाचा कार्यक्रम पार पडला .विद्यार्थांना मार्गदर्शन करताना, पी .व्ही.टेकले सर म्हणाले की, विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर ध्येय निश्चित करून वाटचाल करा . त्या दृष्टीने अभ्यास करा . आपले ध्येय गाठण्यासाठी सतत प्रयत्नशिल रहावे . यश निश्चित मिळत असते, असे अवाहन त्यांनी दहावीच्या विद्यार्थ्याच्या निरोप समारंभप्रसंगी केले . अध्यक्षीय समारोप शाळेचे मुख्याद्यापक विलास सिंदगीकर यांनी यांच्या मार्गदर्शनाने केला . ते म्हणाले की , आज गुणापेक्षा गुणवतेला महत्व प्राप्त झाले आहे .विद्यार्थी हे परीक्षार्थी झाले आहेत. गुण मिळवणे हे शिक्षण व्यवस्थेला आलेली सूज व फफुगवटा आहे . तो काही कामाचा नाही . म्हणून विद्यार्थ्यांने गुणवतेपेक्षा गुणाला म्हत्त्व देऊन अभ्यास करावा . तुम्ही कितीही मोठया पदावर केलात तरी आई – वडिलांच्या कष्टाला विसरू नका . दहावी ही तुमच्या यशाची पायरी आहे . तुम्ही यशाची एक एक पायरी चढत जाऊन विश्व कवेत घ्या . तुमचे , आई – वडिलांचे , शाळेचे , गाव आणि देशाचे नाव काढा, असे मौलिक विचार त्यांनी मांडून , मार्गदर्शन करून , त्यांना दहावीच्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या . यावेळी ए .जी काळे , देवीदास मरशिवणे, अभंग फफड , माधव सोनकांबळे आदी . मान्यवर उपस्थित होते . ए .जी. क सिंदगीकर यांनी प्रास्ताविक केले, तर शाळेचे सांस्कृतिक प्रमुख मा . कैलास गोंड सर यांनी सूत्रसंचालन आणि आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जे.जी. दळवे , रमेश केंद्रे आणि के .एस. दळवे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी दहावीच्या मुलांनी शाळेसाठी फफॅन ( पंखा ) भेट म्हणून दिले . शेवटी मुलांना सुरुची भोजन देण्यात आले .

# वैज्ञानिक दृष्टीकोन आचरणात आणावा- प्रा.डॉ.केंद्रे

**मुखेड (प्रतिनिधी)** विज्ञानाने दैनंदिन आयुष्य व्यापून टाकले आहे. तरीही अंधश्रद्धेचा पगडा आजही आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती व विकास केलेला आहे. तरीही पण अंधश्रद्धा समाजात बऱ्याच प्रमाणात दिसून येत आहे. प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोन आचरणात आणावा असे प्रतिपादन भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. देविदास केंद्रे यांनी ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर ता. मुखेड येथे आयोजित राष्ट्रीय विज्ञान दिन प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड होते. त्यासोबतच व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव गोवर्धन पवार, उपप्राचार्य अरुणकुमार थोरवे,प्रा. डॉ.मदन गीरी उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा.डॉ.केंद्रे म्हणाले की राष्ट्रीय विज्ञान दिन आपल्या देशात १९८६ पासून सुरुवात झाली. २८ फफेब्रुवारी १९२८ मध्ये रमण प्रभाव हा शोध प्रबंध नेचर या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यानंतर १९३० मध्ये सर चंद्रशेखर वेंकटरमण यांना भारतीय विज्ञान क्षेत्रात पहिला नोबल पुरस्कार देण्यात आला. जेंव्हा प्रकाश पारदर्शक पदार्थाच्या मागे जातो तेव्हा विक्षेपित प्रकाशाची त्याची तरंगलेली आणि वारंवारता बदलते. यालाच रमण प्रभाव म्हटले गेले. राष्ट्रीय विज्ञान दिन २०२४ ची थीम विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान आहे. आज शाळा, महाविद्यालयात अनेक प्रयोग शाळेमध्ये



राष्ट्रीय विज्ञान दिन वेगवेगळे उपक्रम घेऊन साजरे केले जातात. भाषणे, निबंध स्पर्धा, राष्ट्रीय चर्चासत्रे,राष्ट्रीय परिषदा, विज्ञान प्रदर्शन, घटक चाचणी घेऊन साजरा करतात. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान या विषयाची आवड निमार्ण करावी आणि समाजामध्ये विज्ञानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी.हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून विज्ञान दिन साजरा केला जातो.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. हरिदास राठोड म्हणाले की वैज्ञानिक विकासाने लोकांचे अस्तित्व अनेक प्रकारे बदलले आहे. विज्ञानाने जीवन सुधारले आहे. विज्ञान क्षेत्रातील प्राध्यापकांनी समाजामध्ये जाऊन प्रबोधन करावे म्हणजे विज्ञानाचा प्रचार प्रसार होईल आणि त्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजवला जाईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.मदन गिरी यांनी केले तर आभार प्रा.डॉ. सखाराम गोरे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाल बहादूर विद्यालयात मराठी दिनानिमित्त मराठी स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या जयंती निमित्त मराठी दिन उत्साहात साजरा करण्यात आला .यावेळी मातृभाषेचे महत्व वृद्धिंगत करण्यासाठी विद्यालयाच्या वतीने मराठी स्वाक्षरी मोहिम या अभिनव उपक्रमाचे आयोजन विद्यार्थी व शिक्षकांसाठी केले होते. याप्रसंगी प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष व्यंकटराव गुरमे, संकुलाचा माजी विद्यार्थी विवेक जाधव, मुख्याध्यापक अंबादास गायकवाड उपमुख्याध्यापक संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, लालासाहेब गुळभिले, माधव मठवाले, स्नेहसंमेलन प्रमुख किरण नेमट,मराठी विषय प्रमुख अनिता येलमटे व अनिता मुळखेडे यांची विशेष उपस्थिती होती.

मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमात मराठी भाषा ही राजभाषा असून आपल्या दैनंदिन व्यवहाराची भाषा बनावी यासाठी आपली स्वाक्षरी सुद्धा मराठीतच असावी यासाठी विद्यालयाच्या वतीने मराठी स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत सर्व शिक्षक विद्यार्थी व पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

यावेळी मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित असलेले व्यंकटराव गुरमे ,विवेक जाधव , मुख्याध्यापक अंबादास गायकवाड उप मुख्याध्यापक संजयराव कुलकर्णी यांनी सर्व मराठी शिक्षकांना व विद्यार्थ्यांना मराठी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व कायम राहावे यासाठी विद्यालयाच्या वतीने अनेक मराठी उपक्रम घेण्याचे धोरण असल्याचे उप मुख्याध्यापक संजयराव कुलकर्णी यांनी नमूद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक मराठी विषय प्रमुख अनिता येलमटे यांनी केले तर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी मराठी विषयाच्या सहप्रमुख अनिता मूळखेडे, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख बालाजी पडलवार मीनाक्षी कस्तुरे ,गुरुदत्त महामुनी व सर्व मराठी शिक्षकांनी सहकार्य केले.


Caring Since 1980

कै. यशवंतराव बहुउद्देशिय मेडिकल रिसर्च सेंटर द्वारा संचलित

४१ वर्षापन

यशवंत नेत्र रुग्णालय व फॅको सेंटर

(दृष्टी–एकमेव ध्येय)

डॉ. विश्वास य. सताळकर – नेत्ररोग तज्ञ | डॉ. यशोधन वि. सताळकर – बाल नेत्ररोग तज्ञ | डॉ. अनुजा य. सताळकर – नेत्ररोग तज्ञ

यशवंत नेत्र रूग्णालय व फॅको सेंटर

नंदादीप, नगर परिषदेच्या मागील बाजूस, नई अबादी, उदगीर फोन : 02385-256215




उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो



उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



DEEPJYOTI EYE HOSPITAL UDGIR

दिपज्योती डोळयांचा दवाखाना

डॉ. ज्योती सोमवंशी

30 वर्षाचा अनुभव

डोळयांचे 60 हजार यशस्वी ऑपरेशन

M.B.B.S., M.S. Ophthalm
Consultant in Catract, Glaucoma,
& Pediatric Ophthalmologist

उपलब्ध सुविधा

उदगीर शहरात प्रथमच आत्याधूनीक मशिन (Infinity) व्दारे शस्त्रक्रिया.भुल न देता डोळया वरील मोतीबींदूचे शस्त्रक्रिया. मल्टीफोकल लेन्स यामुळे दुर आणी जवळचे चष्मा न घालता दिसण्याची सोय (Spectacle Free).बीनाटाक्याची मोतीबींदूवर शस्त्रक्रिया.लहान मुलामध्ये मोतीबींदू वर उपचाराची सोय.काच बिंदूचे निदान, उपचार,शस्त्रक्रियाची सोय. डोळयावरील पडदा, नासूर उपचाराची सोय.कॉम्प्युटर व्दारे नेत्र तपासणी.

नाईक चौक,निडेबन रोड, उदगीर जि.लातूर

"WE CARE FOR YOUR EYES"


## जाहिरनामा

### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ३८ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार सायराबी भ्र. हुसेन बदनाळे ज्यापेक्षा पती नामे हुसेन हासनसाब बदनाळे हे दिनांक ११/११/२०२२ रोजी मौजे. कमरोद्दीनपुर (पं.) देवणी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | सायराबी भ्र. हुसेन बदनाळे | ५७ | पत्नी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २८/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०३/०४/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक | शिक्का | (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा

### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. २६ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार भुवनेश पि. सुर्यकांत गरीबे ज्यापेक्षा वडील नामे सुर्यकांत मनमत गरीबे हे दिनांक १३/०२/२०२३ रोजी भिवंडी ठाणे येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | राजेश्री भ्र. सुर्यकांत गरीबे | ४८ | पत्नी |
| २) | भुवनेश भ्र. सुर्यकांत गरीबे | २८ | मुलगा |
| ३) | नेहा भ्र. योगेश बिरादार | २६ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २६/०३/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक | शिक्का | (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७६/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Ram Baliram Daji हे दिनांक २६.०७.२०२३ रोजी Tondar येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

Shubhati W/o Ram Daji, Age 32 yrs, Occu. H.H.,
R/o. Tondar Tq.Udgir Dist.latur

यांनी खालील नमूद ४ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Shubhati Ram Daji | 32 | Wife |
| 2) | Priyanka Ram Daji | 13 | Daughter |
| 3) | Swaroop Ram Daji | 10 | Son |
| 4) | Sumanbai Baliram Daji | 68 | Mother |

अर्जदार याने Ram Baliram Daji या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Ram Baliram Daji यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ०१/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १६/०३/२०२४

आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे) कनिष्ठ लिपिक सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर | (एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६३/२०२४ निशाणी क्रमांक ०६

ज्याअर्थी नामे Malanbi W/o. Manikrao Perke हे दिनांक २९.०३.२००५ रोजी Mauje Ekurka Road Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Rangnath S/o Manikrao Perke,Age 82 yrs, Occu. Agri.
2) Murhari S/o. Manikrao Perke, Age 75 yrs, Occu. Agri,
3) Pandharinath S/o. Manikrao Perke, Age 69 yrs, Occu. Agri,
All R/o. Ekurka Road Udgir Dist.latur

यांनी खालील नमूद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Rangnath S/o Manikrao Perke | 82 | Son |
| 2) | Murhari S/o. Manikrao Perke | 75 | Son |
| 3) | Pandharinath S/o. Manikrao Perke | 69 | Son |

अर्जदार याने Malanbi W/o. Manikrao Perke या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Malanbi W/o. Manikrao Perke यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः २३/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.


प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १०/०४/२०२४

आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे) कनिष्ठ लिपिक सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर | (एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

# पानगावचे हेमाडपंथी विठ्ठल मंदिर नव्या रूपात आ. रमेशआप्पा कराड यांच्यामुळे ओळखले जाईल

लातूर / प्रतिनिधी- आयोध्येत प्रभू श्रीराम मंदिराची भव्य दिव्य उभारणी करून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी वर्षानुवर्ष रामभक्तांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण केले त्याच पद्धतीने पानगाव येथील पुरातन हेमाडपंथी श्री विठ्ठल मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा यासाठी दहा कोटीचा निधी मिळवून दिल्याने येणाऱ्या काळात नव्या रूपातील हे मंदिर आ. रमेशआप्पा कराड यांच्यामुळेच ओळखले जाईल अशी भावना व्यक्त करून पानगाव आणि परिसरातील नागरिकांनी आ. कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.



रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथील पुरातन हेमाडपंथी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामासाठी भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी तब्बल ९ कोटी ३४ लक्ष रुपयाचा निधी मंजूर करून आणल्याबद्दल पानगाव आणि परिसरातील नागरिकांच्या वतीने लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी यथोचित सत्कार करून आ. कराड यांचे आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव अनामेमामा, मंदिर ट्रस्टचे प्रदीप कुलकर्णी, माजी उपसभापती अनंत चव्हाण, माजी सरपंच सुकेश भंडारे, माजी जिप सदस्य ईश्र्वर गुडे, चंद्रकांत आरडले यांची प्रमुख उपस्थिती होती.

पानगाव येथील हेमाडपंती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व्हावे या मंदिराचा जिर्णो द्धार आणि सर्वांगीण विकास व्हावा याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब, राज्याचे पर्यटन विकास मंत्री मा. सुधीरभाऊ मुनगंटीवार आणि पुरातन विभागाच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याची वेळोवेळी प्रत्यक्ष भेट घेऊन पाठपुरावा केला. राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने नमो तीर्थस्थळ सुधार अभियान माध्यमातून राज्यातील ७३ ऐतिहासिक व पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय घेतला आ. कराड यांच्या पाठपुराव्यामुळे पानगावच्या विठ्ठल मंदिराचा या योजनेत समावेश करण्यात आला असून या मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामासाठी ९ कोटी ३४ लक्ष ४९ हजार ९३४ खर्चाच्या निधीस राज्याच्या पर्यटन विभाग मंत्रालयाने १ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.

पानगाव आणि परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आणि प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या भाविक भक्तांनी या मंदिराचे पाहिलेले स्वप्न आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याची भावना व्यक्त करून पानगाव आणि परिसरातील मंदिर ट्रस्ट ग्रामस्थ भाविक भक्ताच्या वतीने यथोचित सत्कार करून आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की रेणापूर आणि पानगाव परिसरावर लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे अतोनात प्रेम होते. तेवढे प्रेम मला करता नाही येणार पण त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करतोय. पानगावकरांनी आजपर्यंत जे जे मागितले देण्याचा प्रयत्न केला असून या पुढील काळातही विकास कामांना निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही देऊन लवकरच पानगाव येथील मुस्लिम बांधवांसाठी शादी खाना बांधकामा करिता ५० लाखाचा निधी मिळवून देणार असल्याचे बोलून दाखविले.

पानगाव आणि भादा या दोन ठिकाणीचे ग्रामीण रुग्णालय आचारसंहिता लागण्यापूर्वी मंजूर होण्याची शक्यता असल्याची माहिती दिली. गावच्या आणि परिसराच्या विकास कामासाठी गावकऱ्यांनी एकत्र येऊन काम करावे अशी सूचना करून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी विकास पुरुष मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांना समर्थन देण्यासाठी लातूरचा भाजपाचा खासदार रेकॉर्ड ब्रेक मताधिक्क्याने विजय व्हावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे अवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी केले.

यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, पानगाव शहराध्यक्ष गणेश तूरूप, भागवत गीते, गोपाळ शेंडगे वामन संपत्ते, सुरेंद्र हरिदास, मारुती गालफाडे शिवाजी जाधव, बब्रुवान संपत्ते, जब्बार शेख, सतीश कुलकर्णी, ललिता कांबळे, शीला आचार्य, नाथराव गीते, बाळू केंद्रे, योगीराज, शिरसाट, राम भंडारे, गोविंद नरहारे, बंडू केंद्रे, मुन्ना कुलकर्णी, बाबुराव कस्तुरे, हरिभाऊ आचार्य यांच्यासह पानगाव आणि परिसरातील भाजपाचे पदाधिकारी, नागरिक विठ्ठल मंदिराचे भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भारतीय युवा पिढीने फॅशनला बळी न पडता भारतीय संस्कृती टिकेल याकडे लक्ष द्यावे

शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी :- फॅशन ही समाजतली मोठी समस्या बनली आहे.या फॅशन मुळे भारतीय संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. भारतीय संस्कृती ही जगातील आदर्श संस्कृती आहे.पण आता नव्या पिढीला मनवं ते हवं म या तत्वाचा स्वीकार केल्या मुळे, पाश्र्चात्य संस्कृतीचा भारतीय युवा पिढी बरोबरच त्यांच्या माता पिता ही आपल्या लेकराच्या ईच्छेमुळे वस्त्र अंलकार बदलुन नव नवीन फॅशनेबल कपडे मुला मुलीना कपडे घालण्याची परवानगी देतात . त्यामुळे अंगभर कपडयाची जागा आता फिट व थिट्या व अर्ध नग्न कपडयानी घेतल्यामुळे समाजात किळसवाणी प्रकार घडत आहेत . त्यामुळे फॅशनच्या नावाखाली आपल्या लेकराचे लाड पुरविण्यासाठी आताचे आईवडील नको तसे कपडे आपल्या लेकरांना घालत आहेत . त्यामुळे आपली मुळ संस्कृती व संस्कार नामशेष होत चालल्याचे आयोजीत तळेगाव येथे दि २९ फेब्रुवारी २०२४ रोजी सायकाळी शिवनेरी महा विद्यालयाच्या रासेयो च्या व्याख्यानात रमेश सुर्यवंशी बोलत होते .

पुढे बोलताना म्हणाले की परदेशातील नागरीक भारतात येवून म्हणतात आम्हच्याकडे सर्व आहे पण भारतासारखी संस्कृती नाही .तरी पण आम्ही परकीय संस्कृतीचा आवलंब करतो हे मात्र दुर्दैव आहे. मडोक्यावर पदर ,पतीचा आदर धिस ईझ इंडियन मदर हे म आपण ऐकतो.हीच भारताची खरी संस्कृती आहे. पण याकडे आपण डोळेझाक करतो.माणसांनी समाजात जीवन जगत आसताना ,संस्कृती,नियम ,तत्व ,सत्य,हे कधीच बदलू नये,जर यात बदल झाला तर समजावे समाज विनाशाकडे जात आहे. आज भारतातील नागरीकांने स्वीकारलेली फॅशन म्हणजे विनाश कालीन विपरीत बुद्धी असे ते म्हणाले. ते म्हणाले की पारंपारीक भारतीय पेहराव अतिशय चांगला होता पण आज फॅशनमुळे अर्ध नग्न कपडे घालुन अंगप्रदर्शनामुळे अत्याचाराचे प्रमाण वाढले आहेत . आज आई वडीलांनी आपल्या बालकावर चांगले संस्कार करून भारतीय संस्कृती जपली पाहिजे . आजची स्त्री भडक मॅकप करून आपले सौदर्य इतरापेक्षा जास्त खुलून कसे दिसेल यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसुन येते . मॅकअपमुळे आपला मुळ चेहरा खराब करीत आहेत . यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ अमोल इंगळे उपसरपंच जगदीश सुर्यवंशी ,डॉ पांडूरंग मुठ्ठे , पंडीत लवटे व गावातील प्रतिष्ठीत नागरीक यावेळी उपस्थीत होते .

# विद्यापीठ स्तरीय रांगोळी स्पर्धेत दयानंद कला महाविद्यालयातील इरफान पठाण यांस तृतीय क्रमांकांचे पारितोषिकं

लातूर : दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याला साडेतीनशे वर्षे पूर्ण झाल्याबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांच्या वतीने विद्यापीठस्तरीय रांगोळी स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. यात दयानंद कला महाविद्यालयातील इरफान पठाण , बी.ए. निमेशन द्वितीय वर्ष याला तृतीय क्रमांक पटकावला. दोन हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे मा.अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, ललितभाई शाह, रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.अंजली जोशी, डॉ.शिवकुमार राऊतराव , कार्यालय अधीक्षक संजय तिवारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थी इरफान पठाण यांस डॉ.संदीपान जगदाळे, डॉ. मीना घुमे,डॉ. दुर्गा शर्मा, प्रा.इरफान शेख , प्रा.संतोष काकडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# अवयवदानात कर्नाटक देशात दुसऱ्या क्रमांकावर

बंगळूर : अवयवदानाच्या बाबतीतही कर्नाटक देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. रक्तदात्याच्या कुटुंबाला कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी सरकार घेईल. अवयवदात्यांच्या पाठीशी आम्ही उभे आहोत, असे मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान कावेरी येथे विविध अवयवदान करणाऱ्यांच्या कुटुंबियांना प्रशस्तीपत्र वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले की, अवयवदान करताना तुम्ही घेतलेला निर्णय सोपा नाही. तुमच्यामुळे इतरांचे प्राण वाचले आहेत. अवयवदानासाठी अधिकाधिक लोकांनी पुढे यावे असे त्यांनी आवाहन केले.आरोग्यमंत्री दिनेश गुंडूराव म्हणाले की, अवयवदानासाठी नोंदणी केलेल्यांची संख्या ८ हजारांहून अधिक असून गेल्या वर्षभरात केवळ १७८ अवयवदान झाले आहेत.


## नोटीस

श्री संत सावता माळी मदिर देवस्थान, माळी गल्ली, लातूर ता. जि. लातूर नोंदणी क्र. -/०००२२३३ (ला) च्या सर्व विश्र्वस्थांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उपायुक्त, लातूर यांच्या चौकशी क्र.८५२/२३ या योजना अर्जातील दि.२९.१२.२०२३ रोजीच्या आदेशाप्रमाणे सन २०२४ ते २०२९ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी नविन विश्र्वस्थ मंडळाची निवड करावयाची आहे. तरी सर्व विश्र्वस्थांनी दि.०७.०४.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. न्यासाच्या कार्यालयात वेळेवर हजर रहावे ही नम्र विनंती.

टिप : गणसंख्ये अभावी (कोरम) सभा तहकूब झाल्यास अशी सभा अर्ध्यातासाने त्याच दिवशी त्याच ठिकाणी भरविण्यात येईल. त्यास नंतर गणसंख्येचे (कोरम) चे बंधन राहणार नाही.

**सभेपूढील विषय :**

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे
२. सन २०२४ ते २०२९ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी नविन विश्र्वस्त मंडळाची निवड करणे
३. ऐन वेळी येणारे विषयावर मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करणे.

सचिव

## जाहीरनामा

**लातूर येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व, स्तर यांच्या न्यायालयात**

कोर्टाचा शिक्का

**वारसा प्रमाणपत्र क्र.४२३/२०२४**
**ठमाबाई वि. निरंक**
**निशाणी क्रमांक ०६**
**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

ज्यापेक्षा मयत नागनाथ दानाप्पा उटगे यांचा दिनांक २७.११.२०१८ रोजी हरंगुळ बु. ता.जि. लातूर येथे मृत्यू झाला. उपरोक्त प्रकरणात अर्जदार १. ठमाबाई भ्र. नागनाथ उटगे, २. भिमाशंकर पि. नागनाथ उटगे.३. लक्ष्मण पि नागनाथ उटगे, ४. गुरुनाथ पि. नागनाथ उटगे, ५. नवनाथ पि. नागनाथ उटगे, ६. अनुसया भ्र. नागनाथ हरांळे ७. महानंदा भ्र. बब्रुवान हारके यांनी मयत नागनाथ दानाप्पा उटगे यांचे वारस असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांनी उपरोक्त प्रकणात मयत नागनाथ दानाप्पा उटगे यांच्या मृत्यूपश्र्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशी वारस घोषीत करुन तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नाव नोंदणी करण्यासाली इतर कामासाठी त्याच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हकाबह लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयताचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारीख २७.०२.२०२४
पुढील तारीख २८.०३.२०२४

आदेशावरुन
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व स्तर लातूर

व्ही जी गायकवाड
क लिपीक

## जाहीरनामा

**लातूर येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांच्या न्यायालयात**

कोर्टाचा शिक्का

वारसा प्रमाणपत्र क्र.४५४/२०२४
फरीद वि. निरंक
निशाणी क्रमांक ०६

ज्यापेक्षा मयत फकरोद्दीन दाउद शेख यांचा दिनांक १७.१२.१९८६ रोजी लातूर, ता.जि. लातूर येथे मृत्यू झाला. उपरोक्त प्रकरणात अर्जदार फरीद पि. फकरोददीन शेख व इतर वारस १. दाउद फकरोददीन शेख, २. साजेदाबी फकरोद्दीन शेख यांनी मयत फकरोददीन दाउद शेख यांचे वारस असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांनी उपरोक्त प्रकणात मयत फकरोददीन दाउद शेख यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस घोषीत करुन तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नांव नोंदणी करण्यासाठी व ईतर कामासाठी त्यांच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे.

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारीख ०२.०३.२०२४
पुढील तारीख ०२.०४.२०२४

आदेशावरुन
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व स्तर लातूर

व्ही जी गायकवाड
क लिपीक

## सुर्य कल्याण मुंबई रात्र

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

**प्रो. दिपक कुमार**

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.

१००% चान्स पास होणार


पान १ वरून

## पंतप्रधान...

येथून बिष्णू पडारे, अरुणाचल प्रदेश पूर्वमधून किरण रिजिजू, अरुणाचल प्रदेश पश्र्िचममधून तापिर गाओ, आसाम करिमगंजमधून अनुसूचित जातीकडून कृपानाथ मल्ला, सिलचरमधून परिमल शुक्ला बैद्य, ऑटोनमस जिल्हा शेड्यूल ट्राईब अरमसिंग इसो निवडणूक लढवणार आहेत, अशी माहिती विनोद तावडे यांनी दिली.

## राहुल...

केली असता ज्या व्यक्तीने फोन केला होता. तो व्यक्ती नाशिक येथील गंगापूर हद्दीत राहत असून मानसिक आजाराने त्रस्त आहे.

तसेच गेल्या दहा वर्षांपासून त्या व्यक्तीला दारू पिण्याचे व्यसन आहे. व्यक्तीने फोन हा दारूच्या नशेत केला होता. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे. संपूर्ण अहवाल केंद्रीय तपास यंत्रणांना पाठवण्यात आला आहे. तसेच राहुल गांधींच्या दौऱ्याबाबत योग्य ती खबरदारी घेतली जात असून त्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती सुभाष पवार यांनी दिली.

## तर त्या...

८०० कोटी रुपये खर्च केले आहे. मुलींना मोफत शिक्षणाबाबत कॅबिनेट निर्णय झाला आहे. आता जी आर निघेल. तुम्ही सुधरा, सुधारा नाही म्हणत सुधरा म्हणतोय जरा ग्रामीण भागातला शब्द आहे. सुधरा नाहीतर कॉलेजेस बंद करा, असं त्यांनी म्हटलं.

त्यांची मान्यता विद्यापीठ काढून घेईल

पुढे ते म्हणाले, जूनमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाला पर्याय नाही. ज्यांना या धोरणाची जूनपासून अंमलबजावणी करायची नसेल त्यांची मान्यता विद्यापीठ काढून घेईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. ज्या विद्यापीठाला ममता बॅनर्जींसारखे बंड वाटत असेल, आम्ही करणार नाही, अशी त्यांची भूमिका असेल तर त्या विद्यापीठाची मान्यता रद्द होईल. आम्ही दम देत नाही, प्रेमाचा ग्रामीण तरुण म्हणून सल्ला देतोय, असे त्यांनी म्हटले आहे.

## भारतीय...

बिकाचंदानी म्हणाले, की त्यांनी वेळेवर गुगलला सगळी फी भरली असूनही ही कारवाई करण्यात आली. तर, क्कॅकक्कॅक ऍपचे फाऊंडर रवी मित्तल यांनी सांगितले की कंपनी गुगलने दिलेल्या नियमांचे पालन करेल.

## निवडणूक...

सर्व कार्यवाही होणे अपेक्षित आहे. मतदार याद्यांचे अद्यावतीकरण, मतदान केंद्र संख्या, तेथील व्यवस्था, आदर्श मतदान केंद्र उभारणी या सर्व बाबींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी क्षीरसागर यांनी केल्या.

भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचना आणि निर्देश यांच्याबाबत वेळोवेळी राजकीय पक्षांना अवगत करण्यात यावे, अशा सूचनाही त्यांनी चारही निवडणूक निर्णय अधिकारी यांना दिल्या.

## पाणी...

ग्रामीण भागात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा परिषदेने आतापासूनच गावनिहाय उपाययोजनांची यादी तयार करावी. तसेच पाणी टंचाई निर्माण झालेल्या गावांमध्ये तातडीने उपाययोजना हाती घ्याव्यात. कोणतेही गाव पाणी टंचाई उपाययोजनेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

## महायुती...

यादी वाचून दाखवली. आता राज्यातील सर्वांत मोठं बस स्थानक बारामतीत उभारलं आहे. आज करोडो रुपयांची कामे पूर्णत्वाला जात आहेत. बारामतीचा कायापालट झाला आहे, असेही ते म्हणाले.

## पत्रकारांनी समाजाच्या...

आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पत्रकारांनी जे चांगले आहे ते चांगले म्हणून आणि वाईट आहे ते वाईट म्हणून समाजास सांगितले पाहिजे. मात्र चांगल्याचे वाईट आणि वाईटाचे चांगले अशी विसंगती पत्रकारांच्या हातून होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करून व्हॉइस ऑफ मीडियाच्या माध्यमातून पत्रकारांच्या हिताचे काम व त्यांच्या प्रश्र्नाची सोडवणूक केली जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

पत्रकारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शासन पातळीवर जिथे जिथे मदत लागेल तिथे तिथे मी स्वतः पुढाकार घेऊन मदत करेल अशी ग्वाही देऊन आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील ७० हजार कुटुंबांना एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड आरोग्य सुरक्षा योजनेअंतर्गत दत्तक घेऊन त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेतली जात आहे. त्याच धर्तीवर जिल्ह्यातील पत्रकारांना आरोग्य सुरक्षा कवच दिले जाईल असे बोलून दाखविले. देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी गेल्या दहा वर्षात गरजू लाभार्थ्यांना विविध योजनेच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम केले असल्याची माहिती त्यांनी यावेळी बोलताना दिली.

पंचसूत्री कार्यक्रमाच्या माध्यमातून देशातील पत्रकारांना न्याय देण्याचे काम होत आहे. पत्रकाराचे हे संघटन आता ४० देशात पोहोचले आहे येत्या दोन वर्षात १९५ देशात पोहोचेल असे सांगून वाईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यावेळी बोलताना म्हणाले की, लढा आणि चळवळ याला कृतिशीलतेची जोड दिल्यामुळे हा प्रवास विस्तारत असल्याचे सांगून पत्रकारांच्या घर बांधणीचा प्रकल्प लातूर शाखेने हाती घ्यावा अशी सूचना केली.

याप्रसंगी एमआयटीचे डॉ. एन. पी. जमादार, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त पत्रकार प्रशांत शेटे, संग्राम वाघमारे, विनोद नीला, विकास स्वामी यांचा यथोचित सत्कार केला. आरोग्य शिबिरात उपस्थित दोनशेहून अधिक पत्रकारांची तज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सितम सोनवणे यांनी केले तर शेवटी जिल्हा कार्याध्यक्ष शहाजी पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास व्हाईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेचे जिल्हा, तालुका पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## औसा पॅटर्न...

अभिमन्यू पवार मला भेटायला येणे हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. लोकांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता १० वर्षे आपण औसा तालुक्यात राजकारण केले. लोकांनी भरभरून प्रेम दिले, हे औसेकरांचे उपकार विसरणे शक्य नसल्याच्या भावना बसवराज पाटील यांनी यावेळी व्यक्त करीत आशा पध्दतीने काम होत राहीले तर औसा तालुक्याच्या विकासाचा अनुशेष भरून निघेल, लोकांना न्याय मिळेल, पदाला न्याय मिळेल आणि संपूर्ण मराठवाड्यात सर्वात जास्त मताधिक्याने आमदार अभिमन्यू पवार निवडून येतील आशा प्रकारचे या सर्व गोष्टी विचारात घेतल्यानंतर लोक निश्चितपणाने आपल्या पाठीशी राहतात आपण ज्यावेळेला लोकांना प्रेम देतो घेतो आणि विकासाच्या कामांमध्ये सर्वाना सहभागी करून घेतो त्यावेळेला लोक आपल्याला मदत केल्याशिवाय राहत नाहीत असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश सुरक्षित आहे. विकासाकडे देशाची वाटचाल सुरू आहे. समाजातल्या प्रत्येक घटकाला कसं न्याय देता येईल आणि या देशाचे नाव जगात नावलौकिक करता येईल यासंबंधीचा प्रयत्न नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आज राज्यसुद्धा पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न होत आहे असे माजीमंत्री बसवराज पाटील यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की बसवराज पाटील यांचा निर्णय भारतीय जनता पार्टीच्या पूर्ण मराठवाड्याच्या राजकारणाला कलाटणी देणार निर्णय आहे. धाराशिव, लातूर जिल्ह्य़ाच्या राजकारणात तर मोठी पकड आहेच याचबरोबर सोलापूर, नांदेड या भागासह बिदर, भालकीसह गुलबर्गा याही ठिकाणी कर्नाटक च्या भाजप पक्षाला मोठा फायदा होणार आहे. देशात नरेंद्र मोदी व राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मागच्या काळात प्रगती झाली असून आजहि होत आहे. त्या विकासाकडे बघून भाजप पक्षात प्रवेश केला आहे असे बसवराज पाटील यांनी म्हणत तुम्ही काही काय द्याल अथवा न द्याल याचा विचारही केला नसल्याचे त्यांनी मोठ्या मनाने सांगितले.यावेळी मोठ्या संख्येने औसा मतदारसंघासह धाराशिव, सोलापूर व कर्नाटक येथील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



यशवंत

रविवार दिनांक०३ मार्च २०२४

# उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com





**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


## कस्तुरबाई नर्सिंग मधील विद्यार्थ्यांना पोलिओ लसीकरण प्रशिक्षण

**उदगीर (प्रतिनिधी)** पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत प्रत्यक्ष कार्यासाठी प्रथम च विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे . संपूर्ण राज्यात आशा कार्यकर्ती यांचा संप असल्यामुळे शुक्रवार (ता.०१) पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी जी. एन. एम. आणि ए. एन. एम. च्या विद्यार्थ्यांना तालुका आरोग्य विभाग माफर्फत पोलिओ लसीकरण बाबत कस्तुराबाई नर्सिंग स्कूल येथे प्रशिक्षण देण्यात आले .तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय उदगीर माफर्फत कस्तुरबाई नर्सिंग स्कूल उदगीर येथे पोलिओ लसीकरण प्रशिक्षण देण्यात आले.यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ प्रशांत कापसे , पर्यवेक्षक व्ही एम गुडमेवार , आरोग्य सेवक अनिल सांगवे यांनी बालकांना लस कशा पद्धतीने पाजायची आहे , करंगळीला शाई लावणे , बालकाची नोंद याबाबत प्रशिक्षण दिले . यावेळी प्राचार्य उषा कुलकर्णी , प्रा रेखा रनक्षेत्रे , प्रा बिभीषण मद्देवाड, आकाश राठोड, राहुल जाधव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# महासंस्कृती महोत्सवातून उदगीरकरांसाठी सांस्कृतीक मेजवानी : ना. संजय बनसोडे








**उदगीर (प्रतिनिधी)** तालुक्यात पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासोबतच येथील नागरीकांसाठी साहित्य, सांस्कृतिक आणि क्रीडा विषयक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, राज्यस्तरीय युवा महोत्सव आणि विविध क्रीडा स्पर्धांचे यापूर्वी आयोजन केले होते.

येत्या काळात खाशाबा जाधव यांच्या नावाने महादंगल राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा घेण्यात येणार असुन यावेळी लेझर शो व फायर शो करण्यात येणार असुन आज आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ममराठी बाणाफ हा महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित महासंस्कृती महोत्सव अंतर्गत हा कार्यक्रम होत असून उदगीर तालुक्यातील रसिकांसाठी यामुळे सांस्कृतिक मेजवानी मिळणार असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी उद्घाटनप्रसंगी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसिलदार राम बोरगावकर, अभिनेत्री रिंकू राजगुरू, श्रीमती शिल्पाताई संजय बनसोडे, माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, व्यंकट बेंद्रे,उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल शेख, पो.नि. अरविंद पवार, पो.नि. करण सोनकवडे ममराठी बाणाफचे अशोक हांडे यावेळी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित महासंस्कृती महोत्सवात उदगीर येथे येथे झालेल्या ममराठी बाणाफ कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फफूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमासाठी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारा भव्य सेट उभारण्यात आला होता. तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. अभिनेत्री रिंकू राजगुरू यांच्या सैराट चित्रपटातील संवादाने कार्यक्रमाला सुरुवात झाली.

महाराष्ट्रातील लोककलेचे दर्शन घडविणाऱ्या ममराठी बाणाफ या कार्यक्रमात प्रारंभी मउठी उठी गोपालाफहे भक्तीगीत सादर करण्यात आले. त्यानंतर ग्रामीण भागात सकाळच्या प्रहरी शेताकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांची लगबग आणि गाव जागवित येणाऱ्या वासुदेवाच्या स्वारीचे दर्शन कार्यक्रमात घडले. सोबतच विठ्ठल - रुक्मिणीच्या नामाचा गजर करीत निघालेली दिंडी या कार्यक्रमात अवतरली. यावेळी टाळ-मृदुंगाच्या तालावर रसिकही तल्लीन होवून गेले. मभलकरी दादा भलं रं...फची साद घालत शेतकऱ्याच्या शिवाराचं दर्शन घडविणारे गीत यावेळी सादर झाले. त्यानंतर मसुंबरान मांडलं गा...फ हे लोकगीत सादर झाले. या गीतांना प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

आदिवासी ठाकर समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे मआम्ही ठाकरं ठाकरं या रानाची पाखरं...फ आणि मलिंगोबाचा डोंगुर आभाळी गेला..फ या गीतावरील आदिवासी नृत्य विशेष लक्षवेधी ठरले. ममाळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं पाणी जातं...फ आणि म शेत बघा आलंय राखणीला...फही शेतकरी गीते यावेळी सादर झाली. मकानडा राजा पंढरीचाफ हा अभंग, मतिरपी नजर माझ्यावरी या सावळ्या हरीची...फ ही गवळण, संत परपंपरेत समाजाचं प्रबोधनाचं प्रभावी साधन ठरलेले भारुडही यावेळी सादर झाले. ममराठी पाऊल पडते पुढे...फ या गीताला अभिनयाची जोड देत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य लढ्याचे दर्शन घडवत मराठी अस्मिता आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेची महानता या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आली. यानिमित्ताने उपस्थितांमध्ये चैतन्य निर्माण केले. पारंपरिक विवाह सोहळा, नवविवाहितेची पहिली मंगळागौर, लावणी, कोळीगीत, गोंधळ यासह विविध लोककलांचे आणि लोकगीतांचा ठेवा यावेळी प्रेक्षकांसमोर ठेवण्यात आला. त्याला उदगीरकर रसिकांचा उत्स्फफूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमापूर्वी स्थानिक कलाकारांनी आपल्या कलेचा अविष्कार सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

### समृध्द सांस्कृतिक वारसा अनुभवण्याची संधी : जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर

महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा ममराठी बाणाफ कार्यक्रम ऐतिहासिक उदगीर शहरात होत आहे. य कार्यक्रमामुळे आपला समृध्द आणि वैभवशाली सांस्कृतिक वारसा अनुभवण्याची संधी मिळत असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी यावेळी सांगितले.

## लातुरात सोमवारपासून दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन



**उदगीर (प्रतिनिधी)** उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या दयानंद सभागृहात सोमवार, दि. ४ व मंगळवार दि. ५ मार्च २०२४ रोजी लातूर ग्रंथोत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी दिली. या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते सोमवारी सकाळी ११ वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. सुधाकर शृंगारे , खा. ओमराजे निंबाळकर, आ.अमित देशमुख, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. रमेश कराड, आ. बाबासाहेब पाटील, आ. धीरज देशमुख, आ. अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, राज्याचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले , छत्रपती संभाजीनगरचे सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे यांची उपस्थिती राहणार आहे. सोमवारी सकाळी ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून ग्रंथदिंडी निघेल. या ग्रंथदिंडीचे पूजन जिल्हा ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. आरती झंवर, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांच्या हस्ते होईल. दुपारी वसंतराव हंकारे यांचे म बाप समजून घेताना म या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी, साहित्यिक भारत सातपुते हे राहणार आहेत. सायंकाळी ज्येष्ठ साहित्यिक फ्रा. म . शहाजिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होईल. मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता बालकांचे कथाकथन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाल साहित्यिक रमेश चिल्ले हे राहणार आहेत. तसेच प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली म वाचन आधी की लेखन आधी म या विषयावरील परिसंवाद होणार आहे. यामध्ये चंद्रशेखर मलकमपट्टे, प्रा. राजशेखर सोलापूरे , विवेक सौताडेकर सहभागी होणार आहेत. दुपारी जी. जी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन होणार आहे. कथाकथनात धनंजय गुडसूरकर, नयना राजमाने, विलास सिंदगीकर, अंबादास केदार अनिता यलमटे हे सहभागी होणार आहेत. दुपारी अडीच वाजता म साहित्याने मला काय दिले म या विषयावरील परिसंवाद होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शेषेराव मोरे हे राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून सुरेंद्र पाटील, जयद्रथ जाधव, मोहिब कादरी , अनंत कदम उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी साडेपाच वाजता ग्रंथोत्सवाचा समारोप समरंभ होणार आहे. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे हे राहणार आहेत. यावेळी सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा कोषागार अधिकारी उज्वला पाटील, जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या ग्रंथोत्सवात लातूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी, ग्रंथपाल, कर्मचारी व ग्रंथप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ग्रंथोत्सव समन्वय समिती व ग्रंथोत्सव संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## गुडसूरचे डॉ. पारसेवार यांना इंडियन अचिव्हर्स अवार्ड



**उदगीर (प्रतिनिधी)** नवी दिल्ली येथील इंडियन ॲचिव्हर्स अवॉर्ड संस्थेमार्फत वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठीचा सन्मान नुकताच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सामाजिक , वैद्यकीय , शिक्षण व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या देशभरातील तीस जणांना हा सन्मान देण्यात येतो. वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल पारसेवार यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे.

गुडसूरचे भूमिपुत्र असलेल्या डॉ .पारसेवार यांचे शालेय शिक्षण गुडसूर येथे झाले असून महिलांच्या आरोग्य क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. साई हॉस्पिटल वसई येथे त्यांची रूग्णसेवा सुरू असून सामाजिक जाणिवा असणाऱ्या डॉ .पारसेवार यांनी वैद्यकीय क्षेत्रात सामाजिक सेवेची पायवाट निर्माण केली आहे. वर्षापासून कार्यरत असलेल्या प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ बळीराम डी पारसेवार यांना त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल इंडियन अचिव्हर्स आवार्ड प्रसिद्ध केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या शुभहस्ते व अन्य मान्यवर मंडळीच्या उपस्थित भव्य कार्यक्रमात , दिल्ली येथील रेजन्सी हॉटेलच्या सभागृहात डॉ .पारसेवार यांचा ना.नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

डॉ पारसेवार यांच्या या यशाबदल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर इंजि.अजय मुडपे, प्रा संजय मुडपे ,इंजि अनिल मुस्कावाड ,प्रा कुमार बंडे, पत्रकार माधव इतबारे यांच्यासह गावक-यांनी अभिनंदन केले आहे.

## संगीतरत्न डॉ. कृष्णराज अनवले यांच्या बहारदार गायनाने रसिक मंत्रमुग्ध



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील श्री संत नरहरी महाराज दैवज्ञ सोनार संघ शाखा उदगीरच्या वतीने श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित दि. २७ फ्रेब्रू २०२४ रोज मंगळवार या दिवशी सद्गुरू शंकर लिंग महाराज मठातील सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक कलावंत संगीतरत्न डॉ. कृष्णराज अनवले यांच्या बहारदार गायनाने उपस्थित रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व श्री गणपतराव नखाते व प्रमुख पाहूणे म्हणून माजी लातूर जिल्हा परीषद अध्यक्ष श्री. राहुल भैय्या केंद्रे उपस्थित होते.

प्रा. डॉ. अनवले यांनी आपल्या गायनाची सुरुवात अप्रचलीत अशा राग- जोगकंस मधील सांप्रदायीक रामकृष्ण हारी विलंबित ठाय-- लयीतील भजनाने केली. नंतर अत्यंत जलद लयीतील रुपाचा अभंग सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. संत नामदेवांच्या मआधी रचिली पंढरीफ या अभंगाला उपस्थित रसिकांनी विशेष दाद दिली तर. मदेवा तूझा मी सोनार या अभंग रचनेने त्यांनी कार्यक्रमात चैतन्य आणले, कार्यक्रमात इतर काही मराठी अभंग व संत कबीरांची भजने सुध्दा त्यांनी तयारीने सादर केली. शेवटी विठ्ठल.. विठ्ठल गजरी या भैरवी ने त्यांनी आपल्या गायनाची सांगता केली.

या कार्यक्रमासाठी त्यांना साथसंगत अनुक्रमे श्री ऋषीकेश अनवले (तबला)श्री दामोदर रत्नपारखे चाकूर (हार्मोनियम), श्री एकनाथ रत्नपारखे (मृदंग) श्री नरसन धुळे (टाळ) यांनी केली तर सहगायन चि. सर्वजित अनवले यांनी केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार सौ स्मिता पोतदार मॅडम यांनी केले. कार्यक्रमास समाज बांधव आणि रसिक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.